POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२८० ● मुंबई, सोमवार, १२ मे २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## किनारपट्ट्याला 'शूट टू किल'चे आदेश

### महाराष्ट्राच्या ८७८ किलोमीटरच्या किनारपट्टीसाठी आदेश लागू



■मुंबई | प्रतिनिधी :

महाराष्ट्रातील मासेमारी विभागाने मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांसाठी विशेष सूचना जारी केली आहे. अरबी समुद्रामध्ये तेल उत्खनन चालतं अशा ठिकाणी तसेच संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या समुद्रातील भागांमध्ये म्हणजेच नौदलाच्या भागात मासेमारीसाठी जाऊ नये असा इशारा जारी करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या ८७७.९७ किलोमीटर लांबीच्या समुद्रकिनाऱ्यासाठी हा नियम लागू असणार आहे, असंही जाहीर करण्यात आलं आहे.

**महत्त्वाची बैठक**

भारत-पाकिस्तान सीमेवर तणावपूर्ण वातावरण असून पाकिस्तानकडून सातत्याने ड्रोन्स आणि शस्त्रसंधीचं उल्लंघन करुन कुरघोड्या करण्याचा प्रयत्न सुरु आहे. याच पार्श्वभूमीवर भारतीय नौदलाने मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांबरोबर एक विशेष बैठक घेतली. मुंबई आणि कोकण किनारपट्टीवर मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांबरोबरच, मासेमारी विभाग, कोस्टल पोलीस, सेंट्रल इंडस्ट्रीयल सिक्युरीटी फोर्स आणि कोस्ट गार्डचे अधिकारीही या बैठकीला उपस्थिती होते. कोळी बांधवांनी मासेमारीसाठी संवेदनशील ठिकाणी जाऊ नये असं या

**१० दहशतवादी समुद्रातूनच आलेले**

२६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यामध्ये १० सशस्त्र दहशतवादी मासेमारी करणाऱ्या बोटीमधून मुंबईत दाखल झाले होते. या दहशतवाद्यांनी एक मासेमारी करणारी बोट हायजॅक करुन प्रवेश केलेला. याच पार्श्वभूमीवर आता मासेमारी करणाऱ्या बोटींचं सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले असून बोटींची ओळख पटावी म्हणून त्यामध्ये जीपीएस लावलेलं असावं असं बंधनकारक करण्यात आलं आहे.

₹किनारपट्टी भागामध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. प्रवेश बंदी असलेल्या भागात प्रवेश केल्यास 'दिसता क्षणी गोळ्या घालण्याचे' म्हणजेच 'शूट टू किल'चे आदेश या उच्च स्तरीय बैठकीत देण्यात आले आहेत,₹ अशी माहिती राज्य सरकारमधील एका वरिष्ठ अधिकाऱ्यांने दिल्याचं वृत्त 'फ्री प्रेस जर्नल'ने दिलं असून हा अधिकारी संरक्षणासंदभार्तील विभागात कार्यरत असल्याचं सांगण्यात आलं आहे.

**पाकिस्तानने जप्त केलेल्या बोटी वापरल्या जाण्याची शक्यता**

''राज्य सरकारबरोबर गुप्तचर यंत्रणांनी शेअर केलेल्या माहितीमध्ये पाकिस्तानी किनाऱ्यांवरील सुरक्षा दलांनी जप्त केलेल्या गुजरातमधील काही मासेमारी करणाऱ्या बोटींपासून धोका आहे. मुंबईजवळच्या परिसरामध्ये घुसखोरी करण्यासाठी या बोटींचा वापर केला जाऊ शकतो. या बोटींवरुन रॉकेट लॉन्चर्सच्या माध्यमातून हल्ले होऊ शकतात,'' असं सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

**सतर्क राहण्याचे आदेश**

मासेमारीसाठी गेलेल्या कोळी बांधवांनी समुद्रातील हलचालींवर बारीक नजर ठेवावी आणि काहीही संशयास्पद आढळून आल्यास सुरक्षा यंत्रणांना तातडीने कळवावं, असं आवाहनही कोस्टल पोलिसांनी आणि भारतीय नौदलाने केलं आहे.




## महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशात मोठा ऐतिहासिक करार

## विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील पाणी प्रश्न मिटणार

**नागपूरच्या ३०-४० वर्षांच्या पाण्याची गरज पूर्ण होणार**

या बैठकीत महाराष्ट्राच्या इतर महत्त्वाच्या मुद्द्यांवरही चर्चा झाली. यात डांगुर्ली बॅरेज आणि जामघाट यांसारख्या प्रकल्पांचा समावेश होता. जामघाट प्रकल्पासाठी २८ वर्षांपूर्वी आपण मध्य प्रदेशातील तत्कालीन मुख्यमंत्र्यांसोबत आलो होतो. आता या प्रकल्पाला गती मिळत असल्याचा आनंद आहे. या जामघाट प्रकल्पामुळे नागपूर शहराच्या पुढील ३०-४० वर्षांच्या पाण्याची गरज पूर्ण होणार आहे. पुढील बैठक ऑक्टोबर महिन्यात आयोजित केली जाईल, ज्यात महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश एकत्रितपणे कोणत्या क्षेत्रांमध्ये काम करू शकतात यावर चर्चा होणार आहे, अशी माहितीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.




**असा आहे तापी मेगा रिचार्ज प्रकल्प**

- धरणः मध्य प्रदेशातील खरिया गुटी घाट येथे तापी नदीवर धरण उभारले जाईल.
- एकूण सिंचनाखालील क्षेत्रः ३,५७,७८८ हेक्टर
- महाराष्ट्राला लाभः २,३४,७०६ हेक्टर (सुमारे ५.७८ लाख एकर) झ्र जळगाव, अकोला, बुलढाणा, अमरावती जिल्ह्यांना फायदा.
- मध्य प्रदेशाला लाभः १,२३,०८२ हेक्टर झ्र बुर्हाणपूर, खंडवा जिल्ह्यांना फायदा.
- एकूण पाणी वापरः ३१.१३ टीएमसी
- महाराष्ट्रः १९.३७ टीएमसी
- मध्य प्रदेशः ११.७६ टीएमसी
- योजनेची अंदाजित किंमतः १९,२४४ कोटी रुपये (२०२२-२३ च्या किमतीनुसार)

■मुंबई | प्रतिनिधी :

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या दोन राज्यांनी आज तापी मेगा रिचार्ज प्रकल्पासाठी एका महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक करारावर स्वाक्षरी केली. सुमारे १९,२४४ कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील खारपाण पट्ट्यातील शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे, अशी माहिती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

आज भोपाळ येथे महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश आंतरराज्य नियंत्रण मंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्यासह दोन्ही राज्यांचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, तुलसीराम सिलावट, कुंवर विजय शाह आणि दोन्ही राज्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत या कराराची माहिती दिली.

''आजचा दिवस महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशसाठी ऐतिहासिक आहे. तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाचा संकल्प आम्ही यापूर्वीच केला होता. आज दोन्ही राज्यांनी यावर सहमती दर्शवत सामंजस्य करार केला आहे. यापूर्वी सन २००० मध्ये दोन्ही राज्यांची बैठक झाली होती, त्यानंतर आता २०२५ मध्ये ही महत्त्वपूर्ण बैठक झाली. मात्र, या प्रकल्पाबाबत दोन्ही राज्य सातत्याने एकमेकांच्या संपर्कात होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने आंतरराज्य जल करारांना गती देण्यास सांगितल्यानंतर २०१६ पासून या प्रकल्पाला अधिक गती मिळाली.'' असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार**

''तापी मेगा रिचार्ज हा जगातील एक अद्भुत प्रकल्प ठरेल. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील २,३४,७०६ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे, तर मध्य प्रदेशातील १,२३,०८२ हेक्टर जमिनीला लाभ होईल. महाराष्ट्रातील जळगाव, अकोला, अमरावती आणि बुलढाणा या खारपाण पट्ट्यातील पिण्याच्या पाण्याची आणि सिंचनाची समस्या या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात सुटणार आहे. यामुळे येथील शेतकऱ्यांच्या जीवनात मोठी क्रांती घडेल आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल. हा प्रकल्प केंद्र सरकारद्वारे राष्ट्रीय योजना म्हणून स्वीकारला जावा, यासाठी आम्ही दोन्ही मुख्यमंत्री लवकरच पुन्हा केंद्र सरकारकडे विनंती करणार आहोत,'' असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## तुमच्या आधारकार्डचा होतोय गैरवापर?

### सिमकार्ड खरेदी करून गुन्हा... ऑपरेशन चक्र-वी म्हणजे काय?



OPERATION CHAKRA-V: FOUR ARRESTED BY CBI IN 'DIGITAL ARREST' CASE

**ऑपरेशन चक्र-वी म्हणजे काय?**

देशातील सायबर धोक्याचा सामना करण्यासाठी, केंद्रीय अन्वेषण विभागाने आर्थिक फसवणूक करणाऱ्या सायबर गुन्ह्यांवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. अऑपरेशन चक्र नावाचे एक नवीन देशव्यापी अभियान सुरू केले आहे. आर्थिक गुन्हयांमध्ये सहभागी असलेल्या सायबर गुन्हेगारांविरुद्ध इंटरपोल, एफबीआय आणि अनेक देशांच्या पोलिस दलांच्या समन्वन्धने ऑपरेशन चक्र सुरू करण्यात आले आहे. याचाच पाचवा टप्पा म्हणजे ऑपरेशन चक्र ५ हे आहे. यात प्रामुख्याने डिजिटल अटक आणि गुंतवणूक फसवणूक रोखण्यासाठी वेगवेगळी पावले उचलली जात आहे.

■नवी दिल्ली | प्रतिनिधी :

डिजिटल अटक, गुंतवणूक फसवणूक यांसारख्या गुन्ह्यांसाठी मोठ्या प्रमाणात बनावट कागदपत्रांच्या आधारे घेतलेल्या सीमकार्डचा वापर केला जातो. सायबर गुन्हे रोखण्यास्त्राठी ऑपरेशन चक्र हाती घेतले आहे. या मोहीमेअंतर्गत सीबीआयने महाराष्ट्रासह देशभरातील आठ राज्यांत छापे टाकले. यामध्ये टेलिकॉम कंपन्यांच्या एजंटची झाडाझडती घेण्यात आली. सीबीआयने पाच एजंटना अटक केली असून त्यांच्या हजारो बनावट ओळखपत्र, शेकडो सीमकार्ड तसेच इतर कागदपत्रे जप्त केली आहेत. सायबर गुन्हे प्रचंड वेगात वाढत असून यामध्ये संघटित गुन्हेगारी प्रमाण अधिक आहे. डिजिटल अटक, गुंतवणुकीमध्ये परतावा देण्याचे प्रलोभन दाखवून फसवणूक अशा गुन्ह्यांच्या संख्या दिवसागणिक वाढत आहे. सायबरमधील ही संघटित गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी सीबीआय ऑपरेशन चक्र-५ ही विशेष मोहीम हाती घेतली आहे. या गुन्ह्यांसाठी प्रामुख्याने बनावट कागदपत्रांच्या आधारे खरेदी करण्यात आलेल्या सिमकार्डचा वापर केला जातो आणि यामध्ये टेलिकॉम कंपन्यांचे एजंट यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे सीबीआयने टेलिकॉम ऑपरेटर्सच्या विविध 'पॉइंट ऑफ सेल' (पीओएस) एजंट्सनी जारी केलेल्या अनधिकृत सिमकार्डची विक्री आणि गैरवापर रोखण्यासाठी आसाम, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगण, कर्नाटक आणि तामिळनाडू या ८ राज्यांमधील ३८ सीबीआयचे देशातील आठ राज्यात छापे टाकले आहेत. त्याचबरोबर ४२ ठिकाणी झाडाझडती घेण्यात आली त्यातून मोठ्या प्रमाणात सिमकार्ड आणि कागदपत्रे हस्तगत करण्यात आली.

**पाच टेलिकॉम एजंटना अटक**

पॉइंट ऑफ सेल एजंट्सच्या ४२ ठिकाणी छापे टाकले. सीबीआयने टाकलेल्या छाप्यांमध्ये अनधिकृत सिमकार्डच्या वितरणात सहभागी असलेल्या मध्यस्थांसह व्यक्तीची ओळख पटवण्यात आली. सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, केवायसीसाठी बनविण्यात आलेली कागदपत्रे जप्त केली. इतकेच नाही तर गुन्ह्यातून मिळवलेल्या रकमेतून खरेदी केलेली जंगम मालमत्ता यावरही टांच आणण्यात आली. याप्रकरणी सीबीआयने केवायसी नियमार्चे उल्लंघन करूम अनधिकृतपणे सिमकार्ड विकल्याच्या कटात सहभागी असलेल्या पाच जणांना चार राज्यांतून अटक केली आहे.

## पावसासोबत उकाडा बेजार करणार

## हवामान अंदाजानं वाढवली चिंता




■मुंबई | प्रतिनिधी :

मागील २४ तासांमध्ये राज्याच्या काही भागांमध्ये पावसानं अंशतः हजेरी लावली. तर, काही भागांन मात्र उष्णतेचा मारा सहन करावा लागला. मुंबई शहर आणि उपनगरांमध्येसुद्धा आता पावसाचा माहोल सरला असून, इथं उकाडा वाढल्याचं पाहायला मिळालं. तर, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये मात्र पावसानं हजेरी लावली. राज्यात सध्या पूर्वमोसमी पावसासाठी पोषक वातावरणनिर्मिती होत असल्याचा प्राथमिक अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तर, विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही भागांना मात्र वादळी पावसाचा इशारा कायम ठेवला आहे. पुढील २४ तासांमध्ये मुंबई शहरासह उपनगरांमध्ये अंशतः ढगाळ वातावरण पाहायला मिळेल. मात्र पावसाचा हलका शिडकावा वगळता हे ढगाळ वातावरण चकवा देत उष्मा वाढल्यानं नागरिकांच्या अडचणी वाढतील असंही स्पष्ट करण्यात आलं आहे. रविवारी सायंकाळपर्यं ढगाळ वातावरण आणि सूर्यकिरणांचा लपंडाव सुरूट असेल. तर, राज्यातील कमाल आणि किमान तापमानात चढ-उतार पाहायला मिळतील. हवामान विभागाच्या निरीक्षणानुसार अरबी समुद्रापासून उत्तर महाराष्ट्र आणि कोकणापर्यंत आणि मराठवाड्यापासून कर्नाटकत ते अगदी तामिनळनाडूपर्यंत कमी दाबचा पट्टा सक्रिय असल्या कारणानं राज्यात पावसासाठी पूरक वातावरणनिर्मिती होताना दिसत आहे. हा पूर्वमोसमी पाऊस असल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचंही हवामान विभागानं स्पष्ट केलं आहे.

## युद्धबंदी, शस्त्रसंधी... नागरिकांमध्ये चिंतेचा सूर कायम... पुण्याबाहेर जाणाऱ्यांचा मोठा निर्णय

**कोणत्या रेल्वेगाड्यांमध्ये झाले बदल?**

- पुणे-जम्मू तावी एक्सप्रेस (११०७७):
  - सेकंड एसी: ९८ वरून १४
  - थर्ड एसी: २८७ वरून ५७
  - स्लीपर: ३७६ वरून ९९
- पुणे-जयपूर एक्सप्रेस (१२९३९):
  - फर्स्ट एसी: १२ वरून ९
  - सेकंड एसी: ५६ वरून २०
  - थर्ड एसी: १४३ वरून ५९
  - स्लीपर: १६४ वरून ६४
- पुणे (हडपसर)-जोधपूर एक्सप्रेस (२०४९६):
  - सेकंड एसी: १९ वरून ८
  - थर्ड एसी: ४३ वरून २०
  - स्लीपर: १८६ वरून ४५

■मुंबई | प्रतिनिधी :

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांच्या सीमाभागात असणाऱ्या तणावाचे दूरगामी परिणाम सद्धा स्पष्टपणे पाहायला मिळत आहेत. रेल्वे आणि हवाई वाहतूक या युद्धजन्य परिस्थितीमुळं प्रभावित झाली असून, कमीजास्त प्रमाणात नागरिकांमध्येही भीतीचं वातावरण कायम आहे. शनिवारी पाकिस्तानशी भारतानं शस्त्रसंधी करत दोन्ही देशांमध्ये युद्धबंदी झाल्याचं वृत्त समोर आलं असलं तरीही देशाच्या सीमावर्ती भाग किंवा त्यानजीकच्या भागांमध्ये जाणाऱ्या नागरिकांनी मात्र हा तणाव पाहता आपला निर्णय बदलल्याचं स्पष्ट होत आहे.

उपलब्ध माहितीनुसार पुण्यातून देशाच्या सीमावर्ती भागात जाणाऱ्या रेल्वे तिकिटांच्या रद्द होण्याच्या प्रमाणात झपाट्याने वाढ झाली आहे. पुण्याहून जम्मू, काश्मीर, राजस्थान, जयपूर,



जोधपूरसारख्या सीमावर्ती भागांमध्ये जाणाऱ्या रेल्वेची तिकिटं प्रवाशांनी मोठ्या प्रमाणावर रद्द केली आहेत. सध्या निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे रेल्वे प्रवासी वाहतुकीवर थेट परिणाम दिसून येतोय.

गेल्या काही दिवसांत या मार्गांवरील गाड्यांना जबरदस्त मागणी होती. सुट्ट्यांचा माहोल, उकाडा यामुळं उत्तरेकडे जाणाऱ्यांचा ओघ वाढता होता. इतकंच काय तर रेल्वेची प्रतीक्षा यादी ३००-३५० पर्यंत गेली होती. मात्र, हवाई हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर रेल्वेच्याही तिकीट रद्दीकरणात लक्षणीय वाढ झाली.

सहसा उन्हाळी पर्यटनासाठी प्रवाशांची प्रचंड झुंबड उडत होती, पण आता यद्धजन्य परिस्थितीनंतर हे चित्र बदललं असून प्रतीक्षा यादी १५० ते २०० ने घसरली असल्याची माहिती रेल्वे सूत्रांनी दिली आहे.

**रात्रीच्या वेळी रेल्वे धावणार नाही, का घेण्यात आला हा निर्णय?**

दरम्यान तणावाच्या या परिस्थितीत भारतीय रेल्वे सतर्क असून, शनिवारीच रेल्वे विभागानं काही निवडक रेल्वेमार्गांवर रात्रीच्या वेळी रेल्वे धावणार नसल्याचं स्पष्ट केलं. यामध्ये अमृतसर, भटिंडा, फिरोजपूर आणि जम्मू काश्मीरचा समावेश आहे. याव्यतिरिक्त भारतीय रेल्वेने जम्मूतून निघणाऱ्या जवळपास सर्व रेल्वेगाड्या रद्द केल्या आहेत.

## प्रेयसीला प्रियकरापासून अलिप्त करण्यासाठी भोंदूबाबाची नवी युक्ती

## अलिबाग तालुक्यात मंतरलेली जडी बुटी टाकली विहरीत



■ रायगड | प्रतिनिधी :

अलिबाग तालुक्यातील सालाव आणि ताडगाव गावातील विहिरींमध्ये एका भोंदू बाबाने केलेला प्रताप उघड झाला आहे. एका मुलीला तिच्या प्रियकरापासून अलिप्त करण्यासाठी भोंदूबाबबाने मुलीच्या वडिलांना एक नवीन युक्ती दिली होती. या युक्तीचा वापर करण्यासाठी गेलेल्या त्या व्यक्तीला गावकऱ्यांनी रंगेहाथ पकडले आहे. मुलाच्या प्रेमापासून मुलीला अलिप्त करण्यासाठी भोंदू बाबाने मंतरलली जडी बुटी मुलीच्या वडीलांकडून थेट गावच्या विहिरीत टाकण्याचा प्रकार उघड झाला आहे.

ज्या विहिरीत ही जडीबुटी टाकली त्या विहिरीचे पाणी पिण्यास या व्यक्तीने नकार दिल्याने या गावकऱ्यांना विहिरीत विष टाकल्याचा संशय आला. यानंतर या गावकऱ्यांनी रेवदंडा पोलिस स्टेशन गाठत संपूर्ण घडलेला प्रकार सांगितल्यानंतर पोलिसांनी या व्यक्तीला ताब्यात घेतले आहे. उर्वरित तपास येथील पोलिस करत आहेत. गावकऱ्यांनी रेवदंडा पोलिस ठाण्यात एकच गर्दी करुन या घटनेसंदर्भात संताप व्यक्त केला आहे.

आपल्या मुलीला प्रियकरापासून अलिप्त करण्यासाठी भोंदूबाबाने मुलीच्या वडिलांना सांगितलेला प्रकार उघड झाल्यानंतर नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. भोंदू बाबाने मंतरलली जडी बुटी मुलीच्या वडीलांकडून थेट गावच्या विहिरीत टाकण्याचा प्रकार केला होता. मात्र, ही गोष्ट गावकऱ्यांच्या लक्षात येताच त्यांनी थेट पोलिस स्टेशन गाठले आहे. गावकऱ्यांनी घडलेला सगळा प्रेरकार वदंडा पोलिस स्टेशन गाठत सांगितला आहे. त्यानंतर पोलिसांनी त्या व्यक्तिला ताब्यात घेऊन चौकशी देखील सुरु केली आहे. दरम्यान, असा चुकीचा प्रकार घडल्यानं हावकरी संताप व्यक्त करताना दिसत आहे.

**अंधश्रद्धेच्या माध्यमातून लोकांना करायला लावतात चुकीच्या गोष्टी**

दरम्यान, अलीकडच्या काळात अनेक ठिकाणी असे भोंदूबाबा दिसत आहेत. अंधश्रद्धेच्या माध्यमातून लोकांना चुकीच्या गोष्टी करायला लावत आहे. यापूर्वी देखील असे अनेक प्रकार उघड झाले आहेत. अनेक ठिकाणी अघोरी प्रथा सुरु आहे. अशा प्रथा बंद झाल्या पाहिजेत. अशा भोंदूबाबांना आश्रय ने देता पोलिसांच्या हवाली केलं पाहिजे अशी भूमिका नागरिक व्यक्त करत आहेत. दरम्यान, अशा घटना घडू नये, अंधश्रद्धेला खतपाणी मिळू नये यासाठी प्रशासन देखील प्रयत्न करत आहे. अशा घटना घडू नये यावर लक्ष ठेऊन आहे.

## नीटची तयारी करणाऱ्या २ विद्यार्थ्यांनी उचललं टोकाचं पाऊल

■अकोला | प्रतिनिधी :

सध्या सर्वच क्षेत्रात स्पर्धा वाढली असून उद्योग, व्यवसाय असो किंवा शिक्षण असो स्पर्धेच्या युगात टीकण्यासाठी स्पर्धेत जोमाने उतरावे लागते. शिक्षण क्षेत्रात शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठीही स्पर्धा पाहायला मिळत आहे. त्यातून, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासाठीचा तणाव वाढल्याने ते टोकाचं पाऊल उचलत असल्याचं दिसून येते. नुकताच १२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाला, त्यावेळी २ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. आता, अकोल्यात नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या २ विद्यार्थ्यांनी एकाच दिवशी जीवन संपवल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे. मात्र, दोघांच्या मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. पोलीस अधिक तपास करत आहेत.



अकोल्यात नीट अभ्यासक्रमाचा सराव करणाऱ्या २ विद्याथ्यार्नी केली आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. येथील १७ वर्षीय पार्थ गणेश नेमाडे आणि १८ वर्षीय अर्णव नागेश देबाजे अशी आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्याची नावे आहेत. पार्थ नेमाडे हा तेल्हारा तालूक्यातील रायखेड येथील रहिवासी असून तो अकोल्यातील न्यू अकॅडमी येथे शिकवणी वर्षात शिक्षण घेत होता. तर अर्णव देबाजे हा अकोल्यातल्या मोठी उमरी भागातील रहिवासी असून त्याच्या आत्महत्येचं नेमकं कारण समजू शकलं नाही. पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केलीय, दोघेही विद्यार्थी नीट अभ्यासक्रमाचा सराव करीत होते. दोन्ही विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनेने अकोल्यात खळबळ उडाली असून पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# संसद नव्हे, संविधानच!

**सर्वोच्च न्यायालयाने संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व अधोरेखित केलं आहे. न्यायालयाने स्पष्ट केलं की, कायद्याचे निर्णय राजकीय विचारांवर अवलंबून नस्तात. खासदार दुबे यांच्या आरोपांवर न्यायालयाने हे उत्तर दिलं. न्यायपालिकेवर लोकांचा विश्वास असणं आवश्यक आहे. न्यायाधीशांवरील भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे लोकांमध्ये शंका निर्माण झाली आहे.**

देशाच्या लोकशाही चौकटीतील सर्वोच्च स्थानाबाबतच्या जुन्या तंट्याला तूर्त पूर्णविराम मिळाला. न्यायपालिका आणि संसद या लोकशाहीतील दोन मजबूत स्तंभांमध्ये हा दृश्य-अदृश्य संघर्ष पूर्वापार चालला आहे. देशातील नागरिकांनी निवडलेले लोकप्रतिनिधींचे व्यासपीठ असल्याने संसदेचे सर्वोच्च स्थान अबाधित असावे, ही झाली नेतेमंडळींची अपेक्षा. सामान्य नागरिकांच्या महत्त्व आणि ममत्वाचा कौल संविधानाकडेच झुकलेला असतो. भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाने एका ऐतिहासिक निर्णयाद्वारे संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व अधोरेखित केले. न्यायाची समीक्षा करण्याची जबाबदारी संविधानाने न्यायपालिकेला प्रदान केली असून न्यायालये परीक्षण करताना संविधानाच्या चौकटीतच कार्य करीत असतात, या तथ्याचा न्यायालयाने पुनरुच्चार केला. कायदेशीर तत्त्व हाच न्यायालयीन निर्णयांचा आधार असतो. राजकीय, धार्मिक वा सामूहिक विचारांवर निकाल अवलंबून नसतो, ही न्यायालयाची स्पष्टोक्ती महत्त्वाची आहे. खटल्यांची सुनावणी हे संवैधानिक कर्तव्य असल्याचे सांगतानाच न्यायालयात जाणे हा लोकांचा कायदेशीर अधिकार असल्याच्या वास्तवाकडेही सर्वोच्च न्यायालयाने लक्ष वेधले. भारतीय जनता पक्षाचे खासदार निशिकांत दुबे यांनी सर्वोच्च न्यायालयावर अराजकतेकडे नेण्याचा आरोप करतानाच सरन्यायाधीशांवरही टीका केली होती. राज्यपालांनी पाठवलेल्या विधेयकांवर राष्ट्रपतींना ठरावीक मुदत घालून देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांवर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही अलीकडेच परखड टीका केली होती. लोकशाही व्यवस्थेत संसदच सर्वोच्च असल्याच्या मताचा त्यांनी पुनरुच्चार केला होता. न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी लागलेल्या आगीच्या घटनेवेळी कोट्यवधीची रोख सापडल्यानंतरही कारवाईला झालेल्या विलंबाबद्दल नाराजी दर्शविताना धनखड यांनी न्यायपालिकेबद्दल थेट संशय व्यक्त केला. खासदार दुबे यांचे आरोप तसेच उपराष्ट्रपतींनी केलेल्या संत्रस्त वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाकडून संसद नव्हे, तर संविधानाचे स्थान देशात सर्वश्रेष्ठ असल्याचा थेट निर्णय आला. द्वेष पसरविण्याचा प्रयत्न करणारी प्रकरणे कठोरतेने हाताळण्याचा संकल्प न्यायालयाच्या निर्णयातून झळकला. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्या. संयजकुमार यांच्या खंडपीठाने दिलेल्या निर्देशांनी लोकशाही संरचनेची ठेवण लक्षात आणून दिली. अर्थात, न्यायपालिकेविषयी श्रद्धा बाळगणाऱ्या देशातील सामान्यांच्या मनात काही किंतु दडले असल्याच्या वास्तवाकडेही लक्ष द्यायला हवे. न्यायाधीशांवर होणारे भ्रष्टाचाराचे आरोप आणि या व्यवस्थेतील न्यूनत्वाने विश्वसनीयता संशयात सापडली आहे. न्या. यशवंत वर्मा यांच्या घरात जळालेल्या नोटांचे घबाड गवसल्यानंतर लोकमनांतील साशंकता उफाळून आली. समानता आणि स्वातंत्र्याच्या सोबतीने न्यायाला विराजमान करायचे असल्यास नागरिकांचा विश्वास पुनर्संपादित करावा लागेल. न्यायालयीन रिक्त पदांनी; तसेच खटल्यांच्या संथगतीनेही सर्वांना व्यथित केले आहे. आभासी सुनावणी आणि डिजिटल प्रक्रियेची मदत घेतल्यानंतरही सद्यस्थितीत देशभरात अंदाजे पावणेपाच कोटी खटले रेंगाळले आहेत. त्यातील सर्वोच्च न्यायालयातील संख्या ऐंशी हजारांहून अधिक आहे. त्वरित न्यायासाठी लोकांनी गैरप्रकारांचा अवलंब केल्यास त्याचा दोष व्यवस्थेवर जाईल. पारदर्शकता तसेच ठरावीक मुदतीचा 'न्याय' अशा ठिकाणी लागू न झाल्याने लोकमनांतील असंतोष वाढतो. वर्मा यांच्या प्रकरणानंतर देशातील सर्वोच्च न्यायालयाच्या २७ न्यायमूर्तींनी स्वतःच्या संपत्तीची घोषणा करून चांगला पायंडा निर्माण केला. या न्यायमूर्तींची संपत्ती आता देशवासीय एका क्लिकवर बघू शकतील. ही पारदर्शकता लोकशाहीच्या चारही स्तंभांमध्ये निर्माण झाली तर लोकक्षोभ कमी होऊ शकेल. संविधानातील नियमांमधून नेमकी तीच अपेक्षा व्यक्त झाली आहे. 'संसद नव्हे, संविधानच' हा सर्वश्रेष्ठतेचा निःसंदिग्ध न्याय आल्याने चारही स्तंभांकडून लोकशाहीच्या जपणुकीचे पारदर्शी प्रयत्न व्हायला हवेत. कोणताही देश केवळ नियम, निकष वा न्यायालयीन निर्णयांवर नव्हे, तर लोकविश्वासावर चालतो या सर्वोच्च तथ्याचे विस्मरण होता कामा नये.

# लक्ष्यवेधी हल्ल्यांचा संदेश



पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकव्याप्त जम्मू-काश्मीर आणि पाकिस्तानमधील वेगवेगळ्या नऊ दहशतवादी तळांवर लक्ष्यवेधी हल्ले केले. भारताची ही मोहीम दहशतवादाच्या विरोधातील भूमिकेमधील सातत्य दाखविणारी आहे. सन २०१५मध्ये मणिपूरमध्ये 'एनएससीएन (के)' या गटाने केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी म्यानमारमध्ये 'ऑपरेशन हॉट परस्यूट' ही कारवाई या गटाच्या विरोधात करण्यात आली होती. २०१६मध्ये पठाणकोट आणि उरी येथे झालेल्या हल्ल्यांनंतर पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये घुसून तेथील दहशतवादी तळांवर हल्ले करण्यात आले. त्यानंतर २०१९मध्ये 'जैश ए महंमद'च्या बालाकोट येथील तळावर हवाई हल्ला केला गेला. 'ऑपरेशन सिंदूर' ही कारवाई म्हणजे याच धोरणाचा भाग ठरतो.

दहशतवादी कारवायांच्या विरुद्ध राष्ट्रहितासाठी आम्ही लष्करी बळाचा वापर करू, ही यामागील भारताची भूमिका आहे. क्षेपणास्त्र हल्ला करताना तो केवळ दहशतवादी गटांच्या केंद्रांवर करून भारताने आपल्या धोरणाच्या निश्चित सीमा स्पष्ट केल्या आहेत. यामुळे पाकिस्तानला एक प्रकारे कोंडीत पकडण्यात आले आहे. या हल्ल्याचे लक्ष्य केवळ दहशतवादी गट आहेत; पाकिस्तान नाही. आज जागतिक पटावर दहशतवादाबाबत सहानुभूती नाही. दहशतवादी गटांच्या बचावासाठी भारताविरुद्ध युद्ध करणे याला अधिमान्यता मिळणार नाही; पण भारताने मात्र अशा प्रकारचे हल्ले करून पाकिस्तानला आणि जगाला एक निश्चित संदेश दिला आहे, की दहशतवादाच्या विरोधात लढताना भारत आंतरराष्ट्रीय दबावाला बळी न पडता लष्करी बळाचा वापर करेल.

पहलगाम हल्ल्यानंतर काश्मीरचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला, हे मात्र खरे. पाकिस्तानच्या मते काश्मीरचा प्रश्न हा फाळणीचा अपूर्ण राहिलेला विषय आहे. भारताला रक्तबंबाळ करण्याचे धोरण पाकिस्तानच्या लष्कराने अवलंबलेले आहे. बंडखोरांद्वारे भारताच्या विरुद्ध छुपे युद्ध छेडणे हा याच नीतीचा भाग. छुप्या युद्धामध्ये केवळ भाडोत्री सैन्याचाच नव्हे, तर अमली पदार्थांचा आणि बनावट चलनांचा वापर होतो. काश्मीरमध्ये घुसखोरी करून स्थानिक जनतेला चिथावणी देत त्यांना हाताशी घेऊन घातपात करणे हे अनेक वर्ष चालू आहे. किंबहुना, सन १९६५चे युद्ध याच पद्धतीने सुरू झाले होते. १९७१नंतर मात्र या पद्धतीमध्ये अधिक नियोजन आणले गेले. पुढच्या काळात मुजाहिदीनांचा वापर करून त्याला धार्मिक स्वरूपदेखील दिले गेले. पठाणकोट (२०१५), उरी (२०१६), अमरनाथ यात्रा (२०१७), पुलवामा (२०१९) येथे झालेले दहशतवादी हल्ले ही काही निवडक उदाहरणे आहेत. हे हल्ले जैश-ए-महंमद किंवा लष्कर-ए-तैयबा यांसारख्या संघटना पाकिस्तानी लष्कराच्या मदतीने घडवून आणत होते. यांना भारताने वेळोवेळी प्रत्युत्तर दिले आहे. मात्र, पाकिस्तानच्या या रणनीतीमध्ये बदल आलेला दिसून येत नाही. काश्मीरमध्ये कायम अशांतता ठेवण्यातच पाकिस्तानला रस आहे; म्हणूनच पहलगाम घडवून आणण्यात आले.

पाकिस्तानाबारोबार सलोखा किंवा मैत्री कधीच नसणार,पाकिस्तानशी असलेले आपले संबंध हे कायम तणावाचे असतील, हे भारत सुरुवातीपासून जाणून होता. मात्र तणावाची कारणे काय आहेत याबाबत भारताचे विचार पाकिस्तानपेक्षा थोडे वेगळे होते. भारताच्या मते, या तणावाची मुळे ही या दोन्ही देशांच्या वैचारिक मूल्यांतील फरक, विभिन्न विचार प्रणाली, वेगवेगळे जागतिक दृष्टिकोन यांत आहेत. सियाचेन, काश्मीर, सिंधू नदीचे पाणी वाटप, सर क्रीकचा प्रदेश यांसारखे वाद हे मूलभूत संघर्षाच्या संबंधातून निर्माण होतात हे भारताचे पारंपरिक मत आहे. म्हणजेच काश्मीरमुळे पाकिस्तानशी संबंध बिघडले, असे नाही; तर काश्मीरचा प्रश्न मुळात वाईट संबंधांमुळे निर्माण झाला. याचाच अर्थ, काश्मीर समस्या सुटली तर दोन्ही देशांमधील संबंध सुधारतील असे नाही; तर इतर काही समस्यांवरून हे संबंध बिघडलेलेच राहतील.

पाकिस्तानचे लष्करप्रमुख आसिम मुनिर यांनी नुकतेच काश्मीरबाबत केलेले वक्तव्य हे नवीन भूमिका मांडणारे नव्हते. परवेझ मुशर्रफ, अशफाक कयानी, कमर बाजवा हे त्यांचे पूर्वसुरी, तसेच झुल्फिकार अली भुट्टो, बेनझीर भुट्टो, इम्रान खान यांसह अनेक राजकीय नेते काश्मीरबाबत वेगळी भूमिका घेत नव्हते. पारंपरिक युद्धाच्या मार्गाने भूराजकीय परिस्थिती बदलता येणे शक्य नाही याची जाणीव असल्यामुळे पाकिस्तानने नेहमीच अपारंपरिक लढ्याचा वापर केलेला आहे. सुरुवातीला 'जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंट'च्या मदतीने, व नंतर मुजाहिदिनांच्या मार्गाने हा लढा लढला गेला. त्या लढ्याला काश्मीरमधील असंतुष्ट फुटीरवादी नेतृत्व नेहमीच पाठिंबा देत होते. त्यांचा वापर पाकिस्तानी वेळोवेळी केलेला दिसतो. अशा प्रकारच्या अपारंपरिक लढ्यामुळे सर्वसामान्य काश्मिरी जनतेवर अन्याय होतो, हे सत्य आहे. काश्मीरमध्ये सर्वसामान्य माणसाला आपल्या रोजच्या जीवनात शांतता आणि स्थैर्य हवे असते, आर्थिक स्वास्थ्य हवे असते. ते साधण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून भारताकडून वेगवेगळे प्रयत्न केले जात आहेत. मात्र, पाकिस्तानस्थित दहशतवादी गटांकडून दबाव किंवा प्रलोभन यांना बळी पडणारे फुटीरवादी विचार असलेले काश्मिरी आहेत हे तितकेच सत्य आहे.

अमरनाथ यात्रेकरूंवर हल्ला, रघुनाथ मंदिरावरील हल्ला, हे सामान्य नागरिकांवर झालेले हल्ले होते; पठाणकोट, उरी किंवा पुलवामा हे लष्करावर केलेले हल्ले होते. म्हणूनच पहलगामसारखा हल्ला पुन्हा होऊ शकतो, याची जाणीव ठेवावी लागेल. अशा दहशतवादी कारवायांबाबत गुप्तचर खात्याकडून माहिती मिळण्यावर निश्चित मर्यादा आहेत. हल्ल्यांना सामोरे जाताना आंतरराष्ट्रीय पातळीवरून भारताला सबुरीचे व शांततेचे उपदेश दिले जातील, थोडीफार सहानुभूतीही मिळेल; परंतु त्यापलीकडे कुठलीही मदत मिळणार नाही याची जाणीव आपल्याला ठेवावी लागेल. युक्रेनमध्ये गुंतलेल्या पाश्चिमात्य देशांना काश्मीरची कटकट वाटते. त्यांच्या दृष्टीने युक्रेनची समस्या ही जागतिक आहे, भारत-पाकिस्तान यांचे वाद जुने आहेत आणि त्यांनी ते सलोख्याने सोडावेत कारण ते 'दहशतवाद' या जागतिक स्वरूपाच्या आव्हानाच्या संकल्पनेत बसत नाहीत. आंतरराष्ट्रीय माध्यमे या घटनेकडे 'दहशतवाद' म्हणून बघायलादेखील तयार नाहीत, हेही लक्षात घ्यावे लागेल. म्हणूनच अशा दहशतवादी हल्ल्यांना सामोरे जाण्यासाठी आपल्याला स्थानिक क्षेत्रातील सुरक्षा व्यवस्थेतेकडे अधिक आग्रहाने बघावे लागेल. इथे केंद्रीय सुरक्षा यंत्रणेवर जबाबदारी देणे गरजेचे वाटते, त्यात लष्कर किंवा निमलष्करी दलांचा समावेश होऊ शकतो. याचा अर्थ सीमावर्ती भागांमध्ये सुरक्षा यंत्रणेची जबाबदारी मुख्यतः स्थानिक सरकारची असेल असे नाही.

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाच्या विरोधात 'ऑपरेशन सिंदूर'सारखी कारवाई महत्त्वाची आहेच; परंतु पाकिस्तानची प्रवृत्ती पाहता काश्मीरबाबत दोन समांतर पातळीवर धोरणे आखावी लागतील. एका पातळीवर लष्करी बळाचा वापर करण्याबाबत अधिमान्यता मिळण्याची गरज आहे, तर दुसऱ्या पातळीवर सुशासन निर्माण करण्यासाठी योग्य ती पावले उचलणे तितकेच गरजेचे आहे. अशा पद्धतीने विचार करण्याची तयारी आपल्याला ठेवावी लागेल, आणि अशा धोरणांना राजकारणातील सर्व स्तरांतून पाठिंबा मिळण्याची अपेक्षा आहे. पहलगामसारखा हल्ला हा शेवटचा नाही. अशा हल्ल्यांना सामोरे जाण्यासाठी कायम दक्षता बाळगण्याची गरज आहे, हे विसरून चालणार नाही.

# शाश्वत जलस्रोत



हवामानबदल, अनियमित पाऊस आणि वाढत्या शहरी लोकसंख्येमुळे दर वर्षी पाणीसंकट अधिक गंभीर होत चालले आहे. भविष्यात त्याचा सामना करायचा असेल, तर नवीकरणीय आणि शाश्वत जलस्रोत शोधण्याशिवाय पर्याय नाही. हवा म्हणजे वातावरणातील पाण्याचा एक स्रोत. हवेत जवळपास १२ हजार ९०० घन किलोमीटर पाणी बाष्परूपात असते. त्यापासून वापरण्यायोग्य पाणी मिळवता आल्यास भविष्यात तो पाण्याचा शाश्वत स्रोत ठरू शकेल. या प्रक्रियेला शास्त्रीय भाषेत वातावरणीय जल संग्रहण म्हणतात. वातावरणीय जल संग्रहणाच्या अनेक पद्धती अस्तित्वात आहेत. त्यापैकी अधिशोषणावर आधारित पद्धती शेती आणि सिंचनासाठी चांगलीच फायदेशीर ठरत आहे. काही पदार्थ संपर्कात आलेले इतर पदार्थांचे रेणू स्वतःच्या पृष्ठभागावर तात्पुरते धरून ठेवतात. ही प्रक्रिया म्हणजे अधिशोषण. आर्द्रताशोषक क्षार, झिओलाइट, सिलिका जेल, जलधनिका अर्थात हायड्रोजेल, सिलिका जेल यांसारखे पदार्थ उत्तम अधिशोषक असतात. अतिसूक्ष्म छिद्रे आणि नलिकांची त्रिमितीय जाळीसारखी रचना असल्याने हे पदार्थ मोठ्या प्रमाणात पाणी धरून ठेवतात. सिलिका जेल स्वतःच्या वजनाच्या ३३ टक्के, झिओलाइट ५५ टक्के, काही क्षार ९५ टक्के, तर हायड्रोजेल आपल्या वजनाच्या १० ते ४०० पट पाणी धरून ठेवू शकतात. शिवाय ते चव, वास, रंगविरहित आणि बिनविषारी असतात. जलसंग्राहक उपकरणांमधील अधिशोषक पदार्थांचा थर हवेतील बाष्प शोषून छिद्रांमध्ये साचवतो. वीज वा सौरऊर्जेद्वारे उष्णता पुरवल्यावर पाण्याचे रेणू पृष्ठभागापासून सुटून द्रवरूपात येतात. पाण्याचा निचरा झाल्यावर अधिशोषक पुन्हा पहिल्यासारखा काम करू लागतो.

# पाकिस्तानची खुमखुमी



**पाकिस्तानमधील, तसेच पाकव्याप्त जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी तळांवर क्षेपणास्त्र हल्ला करताना, आपली कारवाई 'लक्ष्यकेंद्री आणि युद्धाचा भडका टाळणारी' होती, असे भारताने स्पष्ट केले असले, तरी पाकिस्तानकडून कोणत्या ना कोणत्या स्वरूपात प्रतिहल्ले केले जातील, ही अटकळ खरी ठरली. मात्र, भारत हा काही दहशतवाद्यांना थारा देणारा देश नाही. येथे ना दहशतवाद्यांचे तळ आहेत, ना प्रशिक्षण केंद्रे. त्यामुळे पाकिस्तानने भारतीय लष्कराच्या तळांना लक्ष्य करून ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले करण्याचा प्रयत्न केला.**

पाकिस्तानकडून अशी आगळीक होणार याची कल्पना असल्याने भारतातील यंत्रणा सज्ज होत्याच आणि त्यांनी ड्रोन व क्षेपणास्त्र पाडले. पठाणकोट, श्रीनगर, जम्मू यांसह पंजाबमधील जालंधर, लुधियाना, चंडीगड आणि गुजरातमधील भुज आदी संरक्षण तळांवर हल्ला करण्याचा पाकिस्तानचा डाव भारताने अशा प्रकारे उधळून लावला असला, तरी युद्धाचा भडका उडण्याची शक्यता अजिबात कमी झालेली नाही. गेल्या दोन दिवसांत ताबारेषेच्या पलीकडून पाकिस्तान करीत असलेला तोफगोळ्यांचा मारा वाढविला आहे. जम्मूवर ड्रोनहल्ले करून पाकिस्तानने आपली युद्धाची खुमखुमी दाखवून दिली आहे. या युद्धखोरीला भारत प्रत्युत्तर देईलच; पण यामुळे युद्धाची व्याप्ती वाढू शकते. भारताच्या विरोधातील अपप्रचाराची आघाडीही पाकने उघडली आहे. खोट्या आणि बनावट बातम्यांद्वारे तो भारतीयांच्या मनात किंतु निर्माण करण्याचाही प्रयत्न करतो आहे. भारताच्या विरोधात काही तरी वरचढ कामगिरी केली हे देशांतर्गत जनतेला पटवून देण्यासाठी तेथील लष्कराकडून आणखी दुःसाहस होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारताने 'ऑपरेशन सिंदूर' केले ते दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करण्यासाठी; त्यांचे कंबरडे मोडण्यासाठी. पाकिस्तानमधील कोणत्याही लष्करी तळांना भारताने लक्ष्य केले नव्हते आणि तसे स्पष्टही केले होते. मात्र, पाकिस्तानी लष्करासाठी 'ऑपरेशन सिंदूर' हा वर्मी बसणारा घाव होता. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत कारवाई करणार हे जाणून पाकिस्तान सज्ज राहिला असला, तरी क्षेपणास्त्र हल्ला होईल याची कल्पना पाकने केली नव्हती. एरव्ही पाकिस्तानमधील सर्वसामान्यांत लष्कराचा मोठा दरारा असतो. मात्र, गेल्या काही वर्षांत अंतर्गत यादवीमुळे तो कमी झाला आहे. विशेषतः पाकिस्तानी तालिबानींनी आणि बलुचिस्तानातील बंडखोरांनी तेथील लष्करासमोर मोठे आव्हान निर्माण केले आहे. ते परतून लावण्यात लष्कराला अपयश येत आहे.

अगदी अलीकडच्या काळापर्यंत पाकिस्तान आपल्या पश्चिम सीमेबद्दल काळजी करीत नसे; परंतु या सीमेवरील संघर्षही वाढला आहे. बिघडत चाललेली अर्थव्यवस्था, बंद पडलेले उद्योग, वाढती बेरोजगारी, महागाई यांमुळे त्रस्त झालेले तेथील नागरिक लष्कराबाबतही आता उदासीन होत आहेत. अशा स्थितीत भारताच्या विरोधात यश मिळाल्याचे दाखवून आपली गेलेली पत परत मिळविण्याचा प्रयत्न पाकिस्तानी लष्कर करीत आहे. त्यामुळेच युद्धज्वर भडकावण्याची भाषा तिथे होत आहे. लष्कराच्या हातातील बाहुले असलेले तेथील पंतप्रधान आणि अन्य मंत्र्यांनी भारतविरोधी गरळ ओकण्याचे प्रमाण म्हणूनच वाढले आहे.

संकटात अवघा देश एक होतो, ही आपल्यासाठी नवीन गोष्ट नाही. आत्ताही पाकिस्तान विरोधी कारवाईत सर्व विरोधी पक्ष सरकारच्या मागे ठाम उभे आहेत. 'ऑपरेशन सिंदूर' सुरू राहील, असे विधान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सर्वपक्षीय बैठकीत केले आहे. पाकिस्तानच्या सर्व कारवायांना चोख उत्तर दिले जाणार, हा याचा अर्थ. बुधवारी रात्री पाकिस्तानची क्षेपणास्त्रे पाडण्याबरोबरच, लाहोर येथील हवाई संरक्षण यंत्रणाही भारताने निकामी केली आहे. असा प्रकार घडल्याचे पाकिस्तानातील काही सूत्र मान्यही करीत आहेत. मात्र, त्याचबरोबर भारताचे ड्रोन पाडल्याचाही दावा ते करतात.

भारताच्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर लढाऊ विमाने पाडल्याचा दावाही पाकिस्तानने केला होता. प्रत्यक्षात त्यासाठी कोणतेही पुरावे दिले गेले नाहीत. येत्या काळात पाकिस्तानकडून आणखी खोटे दावे केले जाऊ शकतात. देशातील जनता पाकिस्तानच्या या खोट्या माहितीला बळी पडणार नाही, यासाठीही आपल्या यंत्रणांना काळजी घ्यावी लागेल. रणांगणाबरोबरच समाज माध्यमांवरही युद्ध सुरू असून, तेही जिंकावे लागेल. थोडक्यात, सर्व आघाड्यांवरील सज्जता ही आजची निकड आहे. त्यास पर्याय नाही.



# स्वसंरक्षणाची तटबंदी

शत्रूला नामोहरम करायचे, तर आधी आपल्या गडाची तटबंदी अभेद्य हवी. पहलगाममधील हल्ल्यानंतर भारत-पाक यांच्यातील संघर्ष शिगेला पोहोचला असल्याने सर्व शक्यता गृहीत धरून आपला नागरी गड अभेद्य करण्यास अग्रक्रम द्यावा लागणार आहे. त्यानुसारच आज देशभरात जवळपास अडीचशे ठिकाणी नागरी वस्तीत युद्धसुसज्जतेचा सराव होत आहे. पाकिस्तानने आजवर आपल्या नागरी वस्तीत घुसून कुरापती काढण्याचा छुपा प्रयत्न केला आहे. बलुचिस्तानातील बंडखोरीने पाकची लष्करी धुसफूस आधीच प्रचंड वाढली आहे. या पार्श्वभूमीवर भारताने कोणत्याही कृतीद्वारे कडक उत्तर द्यायचे ठरविले, तर आपल्या देशातील अंतर्गत भागांत पाककडून काही घातपाती कारवाया घडविल्या जाऊ शकतात. त्यासाठीच संसद, मंत्रालये, विमानतळ, अणुऊर्जा प्रकल्प, जलाशय, सरकारी आस्थापना अशी संवेदनशील ठिकाणे तर जपावी लागतीलच. परंतु, त्याचबरोबर दाटीवाटीच्या लोकवस्तीतही खबरदारी घ्यावी लागेल.

एरव्ही शांततेच्या काळात नागरी स्तरावर सुरक्षेच्या बाबतीत बेफिकिरी असते. त्याचप्रमाणे संरक्षण दले, पोलिस यांच्यातही शैथिल्य असते. किनारी गस्त घालणाऱ्या बोटी इंधनतुटवड्यामुळे बंद असतात, इशारा देणारे भोंगे नादुरुस्त असतात, पोलिसांकडच्या बंदुका किंवा पिस्तुले मध्येच अडकण्याची शक्यता असते, रेल्वे स्थानकांच्या दरवाजांवर कुणाची पाळत नसते आणि मोक्याच्या ठिकाणचे सीसीटीव्ही बंद असतात. अशा अनेक शक्यता संभवतात. त्यामुळेच या यंत्रणांची वारंवार उजळणी करणे भाग पडते. आग लागल्यावर अग्निशमन बंबाच्या शिडीवरून उतरायचे कसे, याचा कुणालाच सराव नसतो.

हवाई हल्ले झालेच, तर पहिल्या भोंग्यानंतर इमारतीतून बाहेर पडून कुठे जमायचे, याबद्दल आजही सारेच अनभिज्ञ आहेत. या साऱ्या गोष्टींचा सराव वारंवार व्हायला हवा. सरकारी यंत्रणांमधील मरगळ झटकण्याबरोबर जनतेतही सजगता वाढायला हवी. २६ नोव्हेंबरच्या हल्ल्याच्या वेळी कुलाब्यात गच्चीवर कारवाई करणाऱ्या कमांडोंना बिस्कीटचे पुडे फेकण्याचा अगोचरपणाही काही महाभागांना सुचला होता. सध्याच्या काळात आपल्या स्वसंरक्षणात सर्वांत मोठा घरचा भेदी म्हणजे चुकीच्या माहितीचे संदेश, अफवा आणि सोशल मीडियावरचा उतावीळपणा. सैन्याच्या हालचालींचे व्हिडिओ, फोटो जर शेअर करण्याची चढाओढ असेल, तर आपल्याला कुणीच वाचवू शकणार नाही. सरावापेक्षा आपले दैनंदिन व्यवहार सुरू राहणार का, याचीच भ्रांत जनसामान्यांना अधिक असते. त्यामुळे हे सर्व थोतांड ठरणार नाही, याची काळजी सरकारला घ्यावीच लागेल.

**पाकिस्तान आणि व्याप्त जम्मू-काश्मीरमधील नऊ वेगवेगळ्या दहशतवादी तळांवर २४ क्षेपणास्त्रांद्वारे अचूक हल्ले करून भारताने पहलगाम दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिले आहे. 'जैश ए महंमद' आणि 'लष्कर ए तैयबा' या दोन्ही दहशतवादी संघटनांच्या मुख्यालयांसह, दहशतवाद्यांच्या प्रशिक्षणतळांचा नेमका वेध घेणाऱ्या या क्षेपणास्त्र हल्ल्यांनी पाकिस्तानलाही उघडे पाडले आहे.**

# 'सिंधू' ते 'सिंदूर'



आपणही दहशतवादाचे बळी आहोत, असा दावा करून पाकिस्तान भारतविरोधी दहशतवादी कारस्थाने आणि कारवायांबाबत आंतरराष्ट्रीय समुदायाच्या डोळ्यांत धूळ फेकत आला आहे. 'ऑपरेशन सिंदूर' या नावाने भारताने केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांनंतर या दहशतवादी तळांचे वास्तव प्रखरपणे समोर आले आहे. 'जैश ए महंमद'चा म्होरक्या मसूद अझरच्या दहा नातेवाइकांसह अनेक दहशतवादी या कारवाईत मारले गेले आहेत. क्षेपणास्त्र हल्ल्यांची कबुली देतानाच आपले २६ नागरिक मारले गेल्याचा दावा पाकिस्तानने केला असून, भारताला प्रत्युत्तराची धमकीही दिली आहे. पाकिस्तानी सरकार आणि तेथील कायमस्वरूपी सत्ताधारी लष्कर यांनाही अंतर्गत अपयशापासून देशवासीयांचे लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठी युद्धज्वर वाढविण्याची गरज भासते आहे. पहलगामच्या कटामागेही हेच कारण होते. भारताच्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर ताबारेषेवर पाकिस्तानने तोफगोळ्यांचा मारा सुरू केला असून, भारताचे मोठे नुकसान केल्याचा दावाही केला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर सिंधू जलकरार स्थगित करण्यापासून आता 'ऑपरेशन सिंदूर' राबवून भारताने हल्ल्याचा हिशेब पूर्ण केला; परंतु पाकिस्तानकडून प्रतिहल्ल्यांची शक्यता असल्याने युद्धाचे ढग काही काळ राहणार. पाकिस्तानकडून मोठी आगळिक झाल्यास कदाचित युद्धाला तोंडही फुटू शकेल.

पाकिस्तानची पुढची चाल काय असणार, याबद्दल अटकळ बांधता येऊ शकते; परंतु त्याच्यासमोरील मर्यादित पर्याय आहेत. भारताने बहावलपूर आणि मुरिदके या अनुक्रमे 'जैश ए महंमदह्न आणि ह्यलष्कर ए तैयबा'च्या मुख्यालयांवर क्षेपणास्त्र हल्ला केला. या पाकिस्तानच्या अंतर्गत भागांतील हल्ले पाकिस्तानला नक्कीच झोंबले असतील. त्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी तो जम्मू-काश्मीरमधील निरपराधांना लक्ष्य करणार का, असा प्रश्न आहे. मात्र, ते आपलेच नागरिक आहेत, असा पाकचा दावा तो तसे करण्याची शक्यता कमी होते. अन्य भागांत हल्ले केल्यास युद्धाला पुढच्या टप्प्यावर नेल्याची जबाबदारी त्याच्यावर येईल. भारताच्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर अनेक देशांनी नवी दिल्ली आणि इस्लामाबादला युद्ध न वाढविण्याचा सल्ला दिला आहे. पाकिस्तानचा सदाहरित मित्र चीननेही हीच भूमिका घेतली आहे.

क्षेपणास्त्र हल्ल्याबाबत भारताची भूमिका सुस्पष्ट आहे. दहशतवाद्यांद्वारे पाकिस्तानने भारताच्या विरोधात छुपे युद्ध छेडले असून, ठरावीक अंतराने तो कारवाया करीत आला आहे. दहशतवाद्यांचे पालनपोषण, प्रशिक्षण, शस्त्रास्त्रपुरवठा तो करीत असून, त्यांचे तळ प्रामुख्याने व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानी पंजाबमध्ये आहेत. भारतातील दहशतवादी हल्ल्यांमागील या तळांचा वेध घेऊन एक इशारा देऊन आपल्या लष्करी क्षमतेचे दर्शनही घडविले आहे. या कारवाईला 'सिंदूर' हे नाव देऊन; तसेच कारवाईची माहिती देण्यासाठी कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांची निवड करून भारताने 'पहलगाम' घडविणाऱ्यांच्या मानसिकतेला आणि 'द्विराष्ट्र' सिद्धांताला अधोरेखित करणाऱ्या पाकिस्तानी लष्करप्रमुखांनाही दिलेले ते उत्तर आहे.

भारताच्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर पाकिस्तानची भाषा पाहता पुढील काही दिवस युद्धाचे आणि युद्धज्वराचे असतील. माहिती तंत्रज्ञानाच्या काळात युद्ध केवळ रणांगणावरच नाही, तर अन्यत्रही लढले जाते. समाजमाध्यमांमध्ये तर ते गेल्या काही दिवसांपासून सुरू झालेही आहे. अपप्रचाराद्वारे खरी माहिती लपवून ठेवण्याचे तंत्र पाकिस्तानला पूर्वीपासून माहीत आहे. १९७१मध्ये पाकिस्तानी लष्कर भारतासमोर शरणागती पत्करत असताना, तेथील रेडिओवर 'पाकिस्तानची आगेकूच' अशी बातमी सांगितली जात होती! त्यामुळे आताही पाकिस्तानी लष्करासह तेथील अनेकांकडून अपप्रचाराच्या अनेक बातम्यांचा पूर समाजमाध्यमांवर येऊ शकतो. भारतातील एकोप्याला छेद देणाऱ्या, चिथावणीखोर बातम्याही त्यांत असू शकतात. मानसिक युद्धतंत्राचाही वापर होऊ शकतो. हे सर्व लक्षात घेऊन देशात सर्वांनाच सावध राहण्याची आवश्यकता आहे. देशात झालेल्या संरक्षण सरावातील जागरूकता सर्व स्तरांवर वाढायला हवी. रणशिंग फुंकले जात असताना त्याची गरज सर्वाधिक आहे.

# आंबटगोड खिचडी

◆ **साहित्य :** १ वाटी तांदूळ, १ वाटी तुरीची किंवा मुगाची डाळ, १ अख्खं लिंबू, २ हिरव्या मिरच्या, १ चमचाभर जिरं, पाव चमचा हिंग, पाव चमचा हळद, जरासं तेल, चवीनुसार मीठ आणि जरा गोडसर चव येईल तेवढे गूळ किंवा साखर, आधणाचं गरम पाणी ४ वाट्या.

◆ **पाककृती :** डाळ + तांदूळ पाण्यात १०-१५ मिनिटं भिजत घालावेत, नंतर दोन-तीन पाण्यातून धुऊन, पाणी निथळून फोडणीत पडण्याकरता तयार ठेवावेत. कूकर गरम करत ठेवावा आणि जरासं तेल घालून चमचाभर जिऱ्याची फोडणी करावी. ते फुललं की जरासं हिंग घालावं आणि ते फसफसलं की मिरच्यांचे हातानेच मोडून मोठे तुकडे टाकावेत. वर डाळ, तांदूळ आणि हळद घालून मिनिटभर परतावं आणि उकळीचं पाणी घालून नेहमी प्रमाणे खिचडी शिजवून घ्यावी. कूकरचं प्रेशर पडून तो उघडला की खिचडी बुडेल इतकं गरम पाणी परत घालावं आणि गरम करत ठेवावे. यात आता एका संपूर्ण लिंबाचा रस, मीठ आणि साखर घालून चांगले घोटून, ढवळून रटरटू द्यावे. पाच-एक मिनिटांनंतर आच घालवून अगदी गरमच वाढावी. वर साजूक तूप चांगले मोठा चमचाभर घालायला विसरायचं नाही. हवी असेल तर वाढतेवेळी बारीक चिरलेली थोडी कोथिंबीर वर पेरावी. ताज्या कोथिंबिरीचा स्वाद चांगला लागतो आणि खिचडीचा हलका पिवळा अन् कोथिंबिरीचा हिरवागार रंग दिसायलाही छान दिसतो.



# कम्फर्ट व्हर्सेस फॅशन, दोन्ही कसे मिळवाल?



**'आरामदायीपणा सर्वात महत्त्वाचा' हे सर्वश्रुत आहे, परंतु जेव्हा स्त्रियांच्या फॅशनचा विषय येतो, तेव्हा एखादी गोष्ट निवडताना केवळ या एकाच गोष्टीचा विचार करून चालत नाही. गेल्या अनेक वर्षांपासून ॲथलेअरचा ट्रेंड वाढत असताना, स्त्रिया दोन्ही गोष्टी मिळवून देण्याची १०० टक्के शक्यता असल्याचे सिद्ध करत फॅशनविरुद्ध कम्फर्ट असे वादविवादाचे अनेक मार्ग शोधत आहेत. जेव्हा त्या आरामदायी हा शब्द ऐकतात तेव्हा, त्यामध्ये लेगिंग्ज आणि घाम नेहमीच प्रथम गोष्टी असतात, परंतु जेव्हा फॅशनचा विषय येतो, तेव्हा, फॅशनचे समर्थक निःसंशयपणे अधिक सर्जनशील होतात.**

आपण २१ व्या शतकात वास्तव्य करत आहोत, जेथे स्त्रिया सतत समाजात मिसळत असतात, वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनशैली आहेत आणि ही वेळ आपण आपल्या कपड्यांसह अधिक आरामदायक आणि फॅशनेबल निवड करण्याची. चांगली बातमी अशी आहे की, अलीकडच्या काळात लाऊंजवेअर खूप वर्षांनी आले आहेत. केवळ त्यामध्ये भरपूर पर्याय म्हणून नाहीत तर ते सैल, आरामदायी असे कपडे खरोखरच ट्रेंडमध्ये आहेत. आता आपल्या मैत्रिणींसह दिवसातून जास्तीत जास्त वेळा बाहेर फिरायला जाऊ शकता, तुम्ही आरामदायी वाटू शकेल ते ही विशेष काही न बदलता. जर आपण त्यांना 'जॉगर्स' म्हटले तर, तुम्ही त्यांना धावपट्टीवर स्वेटपॅन्टस म्हणून देखील घालू शकता. आपण ड्रेसिंगच्या सुवर्णयुगात राहत आहोत - एका आळशी मुलाचे फॅशन स्वर्ग.

म्हणून, व्हिस्कोस त्याच्या गुणधर्मांसह उच्च श्वासोच्छ्वास, संपूर्ण जैव-विकृती आणि पर्यावरण अनुकूल अशा श्रेणीतील पसंतीची निवड ठरली आहे. व्हिस्कोसपासून बनवलेल्या कपड्यांचे हे सॉफ्ट टेक्स्चर आहे, ज्यामुळे त्यांना सहजपणे पोशाख करणे सोपे होते आणि आपल्याला पाहिजे असलेल्या शैलीत वापरणे सोपे होते. फॅब्रिकची फ्लुएडीटी शरीरावर ड्रेप करण्यास अधिक मदत करते, त्यामुळे फॅब्रिक अंगावर चमकण्यास मदत होते.

कपड्यांसह लेअरिंग अत्यंत सोपे आहे, कारण याचा पोत कपड्याचा गोळा होऊ देत नाही. हे कोणत्याही फॅशनिस्टांसाठी असणे आवश्यक आहे. उज्ज्वल रंग आणि पेस्टल्स रंग ट्रेन्डमध्ये आहेत, त्यामुळे फॅब्रिकची रंगीत होणारी क्षमता आकर्षक बनवते.



# जेवल्यानंतर कधीच खाऊ नका 'या' गोष्टी, आरोग्यास होईल नुकसान

बदलत्या जीवनशैलीनुसार खाण्या-पिण्याच्या पद्धतीत सुद्धा बदल झाला आहे. तर काही जणांना जेवल्यानंतर लगेच झोप येणे, थोड्या वेळाने पुन्हा भूक लागल्याने खाणे अशा विविध सवयी असतात. मात्र या सवयी तुमच्या आरोग्याला धोका पोहोचवू शकतात. हे खरं आहे, कारण जेवल्यानंतर काही गोष्टी खाऊ नयेत किंवा करू नयेत, असा सल्ला दिला जातो. त्यामुळे तुम्हाला सुद्धा जेवल्यानंतर खाणे किंवा झोपण्याची सवय असल्यास ती आजच बदला. याचा फायदा तुम्हाला नक्की होईल.

सकाळचा नाश्ता पोटभरून करायचा, दुपारचे जेवण मध्यम आणि रात्रीचे जेवण अगदी कमी करावे, असे सांगितले जाते. कारण दिवसभरातील आपण ज्या गोष्टी खातो त्या पचण्यास काही काळ लागत असून ते नीट न पचल्यास विविध समस्या उद्भवतात. मात्र जर तुम्हाला जेवणानंतर काही गोष्टी करण्याची सवय असल्यास तर आधीच सावध व्हा, नाहीतर आरोग्यास नुकसान होईल.

◆ जेवल्यानंतर चहा पिण्याची सवय टाळा. कारण यामुळे जेवलेले अन्न पचण्यासाठी समस्या येते. जेवणाच्या एक तास आधी किंवा एक तासानंतर चहा किंवा कॉफी न पिण्याचा डॉक्टरांकडून सल्ला दिला जातो. या सवयीमुळे ॲनिमिया होण्याची शक्यता असते.

◆ फळ उपाशीपोटी खाणे आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. मात्र सकाळचा पोटभर नाश्ता केल्यानंतर फळ खाणे टाळा. कारण नाश्त्यानंतर फळ खाल्ल्यास ते पचण्यास समस्या येईल. फळांचे सेवन तुम्ही संध्याकाळी केले तरी त्याचा धोका उद्भवत नाही.

◆ पचनासाठी पाणी हा उत्तम उपाय आहे. परंतु जेवल्यावर लगेच पाणी पिऊ नका. खासकरून थंड पाणी पिणे टाळा. त्यामुळे पचनक्रिया धिम्या गतीने होते. त्यामुळे जेवल्यानंतर या करू नका. तसेच सिगारेट पिणे, दारू पिणे या सवयी सुद्धा जेवल्यानंतर केल्यास आरोग्यास धोकादायक ठरू शकतात. तर काही जण जेवण झाल्यानंतर आणि झोपण्यापूर्वी अंघोळ करतात. पण ही सवय वाईट असून त्यामुळे शरीरातील रक्तपुरवठा सुरळीत सुरू राहण्यास अडथळा निर्माण होतो.



# तुमच्या हातातील व्हॉट्सॲपमध्ये आता एआयचा शिरकाव; तुम्ही म्हणाल तसे स्टिकर्स बनवून देणार

व्हॉट्सॲप लवकरच एक नवीन फीचर सादर करू शकतं, ज्यामुळे तुम्ही सहज एआय स्टिकर जनरेट करू शकाल. हे फीचर कसं वापरायचं चला जाणून घेऊया. सध्या हे फीचर बीटा टेस्टिंगसाठी उपलब्ध आहे. इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲप बीटानं आपल्या प्लॅटफॉर्मवर एआय स्टिकरचा सपोर्ट ॲड केला आहे. व्हॉट्सॲपवर हे पहिलं फीचर आहे, जे आर्टिफिशियल इंटेलिजेंसचा वापर करेल आणि एआय स्टिकर बनवण्यास मदत करेल.

एआय स्टिकर बनवण्याचा पर्याय फक्त अँड्रॉइड २.२३.१७.१४ अपडेटमध्ये उपलब्ध आहे, ज्याचा वापर फक्त काही निवडक व्हॉट्सॲप बीटा युजर्सच करू शकतात. ही नवीन सर्व्हिस युजर्सना पर्सनलाइज्ड स्टिकर्स बनवण्यास मदत करेल. पुढील काही दिवसांमध्ये हे फीचर सर्व युजर्ससाठी जगभरात रोलआऊट केलं जाऊ शकतं. या फीचरबाबत WABetaInfoनं आपल्या रिपोर्टमध्ये सांगितलं आहे की, नवीन अपडेटमधून आलेलं हे फीचर सध्या मर्यादित टेस्टर्ससाठी उपलब्ध झालं आहे. इतर स्टिकरप्रमाणे, एआय-जनरेटेड स्टिकर देखील स्टिकर टॅबमध्ये ठेवण्यात आले आहेत. स्टिकर जेनरेट करण्यासाठी युजर्सना नवीन क्रिएट बटनवर टॅप करावं लागेल.



◆ व्हॉट्सॲप चॅटमध्ये, स्टिकर विंडो ओपन करण्यासाठी खाली दिलेल्या स्माईली आयकॉनवर टॅप करा.

◆ जेव्हा तुम्हाला हा अपडेट मिळेल, तेव्हा एक पर्याय देण्यात येईल जेनरेट युअर ओन एआय स्टिकरवर टॅप करा.

◆ हे फीचर कधीपर्यंत युजर्ससाठी उपलब्ध होईल, यासाठी व्हॉट्सॲपनं सध्या कोणतीही टाइमलाइन दिली नाही. तसेच मेटानं या जेनरेटिव्ह एआयचं नाव देखील सांगितलेलं नाही, ज्याच्या मदतीनं हे स्टिकर्स बनवले जातील. आताही कंपनीनं स्वतः तयार केलेली एआय टेक्नॉलॉजी आहे की इतर कोणत्या टेक कंपनीशी मेटानं हातमिळवणी केली आहे, ते पाहावं लागेल. तसेच हे स्टिकर्स जेनरेट करताना काही मर्यादा असतील की नाही ते देखील फीचर सर्वांसाठी उपलब्ध झाल्यावरच समजेल.

# थकवा दूर करण्यासाठी ग्रीन टी फेसपॅक

चेहऱ्यावर चमक आणण्यासाठी घरगुती फेसपॅक सर्वोत्तम ठरतो. जेव्हा स्कीन थकलेली किंवा डल वाटत असेल तेव्हा तांदूळ आणि ग्रीन टीचा घरी तयार केलेला फेसपॅक स्किनला रिलॅक्स होण्यास मदत करेल. बघू कसा तयार करायचा हा पॅक...

◆ **सामग्री :** लिंबू, ग्रीन टी, २-३ थेंब पेपरमिंट किंवा टी ट्री तेल.

◆ **कृती :** एका वाडग्यात २ चमचे तांदळाचे पीठ घेऊन त्यात १/४ चमचा लिंबाचा रस मिसळा. त्यात ताजी ग्रीन टी मिसळा. क्रीमसारखं होईपर्यंत मिसळत राहा. आता या पॅकमध्ये ३ ते ४ थेंब पेपरमिंट किंवा टी ट्री तेलाचे मिसळा.

◆ **लावण्याचा विधी :** आपला चेहरा कोमट पाण्याने धुऊन घ्या. मग चेहरा आणि मानेवर पॅक लावा. २० मिनिटांनंतर पॅक धुऊन टाका. चेहरा पुसून मॉइश्चरायझर लावा.



## त्वचेच्या संसर्गापासून मुक्ती मिळवण्यासाठी घरगुती उटणे



**साहित्य :**

एक वाटी मसूर डाळीचे पीठ, कच्चे तांदूळ एक चतुर्थांश कप, आठ बदाम, अर्धा कप गव्हाचा सांजा, चिमूटभर हळद, गुलाबपाणी

**कृती व वापरण्याची पद्धत**

▮ मसूर डाळ, तांदूळ आणि बदाम बारीक वाटून त्याची पूड तयार करा. ▮ या पावडरमध्ये गव्हाची भरड आणि हळद घाला. ▮ या मिश्रणात पाणी किंवा गुलाबपाणी घालून पेस्ट बनवा.
▮ ही पेस्ट चेहरा, मान आणि हातावर लावा.
▮ वाळल्यावर पाण्याने धुऊन घ्या. ▮ आठवड्यातून एकदा या उटण्याचा वापर करावा.

**हे कसे कार्य करते?**

त्वचेच्या सौंदर्यवर्धनासाठी प्राचीन काळापासून उटण्यांचा वापर केला जात आहे. हे त्वचेवरील घाण दूर करण्यास मदत करतं. हळदीत आढळणाऱ्या ॲंटिसेप्टिक गुणधर्मामुळे त्वचेचं संसर्गापासून संरक्षण होतं. बदाम त्वचेचं पोषण करून रंग उजळण्यास मदत करतो.

**अंघोळ केल्यानंतर मिळणारा फ्रेशनेस कशातच नाही. दिवसातून किमान एकदा तरी आपण अंघोळ करतो. अंघोळ केल्यानंतर अंग पुसण्यासाठी आपण टॉवेलचा उपयोग करतो. तुम्ही वापरत असलेला टॉवेल तुमचे शरीर पुसण्याचे काम करतो, पण याशिवाय तुमच्या शरीरावरील मळ काढण्यासही मदत करतो. पण जर तुम्ही तुमच्या टॉवेलची योग्य काळजी घेतली नाही तर मात्र हाच टॉवेल तुमच्या त्वचेचा शत्रू बनू शकतो. आज आम्ही तुम्हाला याबद्दल अधिक माहिती देणार आहोत. त्यामुळे तुम्हीही टॉवेल कसाही वापरत असाल तर हे नक्की वाचा.**

# ...तर तुमचा टॉवेल बनू शकतो तुमच्या त्वचेचा शत्रू

**टॉवेलची स्वच्छता**

काही जणांना टॉवेल सतत धुण्याची गरज नसते, असे वाटते. तुम्ही असा विचार करत असाल तर तो अगदीच चुकीचा आहे. कारण तुम्ही अंघोळ केल्यानंतर तुमच्या शरीरावर साचलेला मळ काढला जातो. त्यामुळे साहजिकच तुमचा मळ टॉवेलवर साचतो. अशावेळी जर तुम्ही हा टॉवेल सतत वापरत राहिलात तर तुमच्या त्वचेवरही मळ साचत राहील. त्यामुळे तुम्हाला स्वच्छ करणाऱ्या टॉवेलची स्वच्छताही तितकीच महत्त्वाची आहे. आठवड्यातून किमान दोन वेळा तरी तुमचा टॉवेल धुणे अपेक्षित असते. जर तुमचा टॉवेल पातळ असेल तर तुम्ही तो रोज धुतला तर फारच उत्तम.

**आता आली फेकून देण्याची वेळ**

टॉवेल कितीही चांगला वाटत असला तरी त्याला वापरण्याचीही काहीतरी मर्यादा आहे. तुम्ही वर्षानुवर्षे एकच टॉवेल वापरू शकत नाही. तुम्हाला कालांतराने टॉवेल फेकण्याचीही गरज असते. तुम्ही कॉटन किंवा टर्किश कोणताही टॉवेल वापरत असाल तरीदेखील तुम्ही हा टॉवेल सहा महिन्यांनी काढून टाकायला हवा. जास्तीत जास्त सहा महिने आणि कमीत कमी ३ महिने तुम्ही टॉवेल वापरायला हवा.

**टर्किश की कॉटन टॉवेल**

तुमची त्वचा ही फारच नाजूक असते. कोणतेही कॉस्मेटिक वापरताना तुम्ही अगदी पारखून सगळ्या गोष्टी तपासता. पण मग टॉवेलबाबतीत का नाही? तुम्हाला लवकर वाळणारा टॉवेल हवा असेल तर तुम्ही पंचा किंवा पातळ टॉवेलची निवड करा. जर तुम्हाला मऊ असा टॉवेल हवा असेल तर तुम्ही टर्किश टॉवेलचा वापर करा. आता तुमच्या आवडीवर टॉवेलची निवड अवलंबून आहे.

**सूर्यप्रकाश महत्त्वाचा**

अनेकांना टॉवेल वाळत घालण्याचा कंटाळा असतो. पण तुमच्या टॉवेलसाठी सूर्यप्रकाश महत्त्वाचा असतो. त्यामुळे तुम्ही तुमचा टॉवेल सूर्यप्रकाशात वाळत घालायला हवा. कारण जर त्या टॉवेलवर काही जंतू असतील आणि तुम्हाला टॉवेल धुणे शक्य नसेल अशावेळी कडकडीत उन्हात टॉवेल ठेवल्यामुळे त्यावरील जीवाणू कमी होतात.



**एकट्याने वापरण्याची गरज**

शेअरिंग-केअरिंगमध्ये तुम्ही एकाच टॉवेलचा दोन ते तीन जण वापर करत असाल तर ते तुमच्या त्वचेसाठी फारच वाईट आहे. कारण दोन ते तीन जणांनी एकच टॉवेल वापरला तर तुम्हाला संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे तुम्ही कधीही एकच टॉवेल दोन ते तीन जणांमध्ये वापरू नका. तुम्हाला त्वचा विकार जडण्याची शक्यता यामध्ये अधिक असते. आता तुम्हाला टॉवेल हा अंघोळीपुरता वाटत असला तरी त्याचे महत्त्व काय ते नक्कीच कळलं असेल, त्यामुळे यापुढे याची अधिक खबरदारी घ्या.



# शरीरासाठी अतिशय घातक आहे साबुदाणा;

## उपवास, व्रत-वैकल्यांसाठी वापरण्याआधी जाणून घ्या गुणधर्म



**हिंदू** धर्मासह इतरही धर्मांत अनेक सण-उत्सव, व्रत-वैकल्ये केली जातात, उपवास ठेवले जातात. यामध्ये एक समान गोष्ट असते ती म्हणजे उपवासाचे पदार्थ. उपवासादरम्यान जवळजवळ सर्व घरांत हमखास वापरण्यात येणारा पदार्थ म्हणजे साबुदाणा. तसाही साबुदाणा पूर्ण वर्षात विविध कारणांनी वापरला जातो, अनेक ठिकाणी साबुदाणा खिचडी, साबुदाणा वडे हे नाश्त्याचे पदार्थ म्हणून त्याला पसंती दिली जाते. मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणारा साबुदाणा आपल्या शरीरासाठी लाभदायक आहे का, याचा कधी विचार केला आहे?

**साबुदाणा शरीरासाठी आहे अतिशय घातक, तुम्हीच पाहा कारणे -**

▮ साबुदाण्याचा जन्म हा इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स या देशांत झाला. साबुदाणा हा सागो झाडांपासून कृत्रिमरीत्या तयार केला जातो. यामध्ये कर्बोदकांचे प्रमाण अतिशय जास्त आहे, त्यामुळे वजन वाढण्यासाठी हा कारणीभूत ठरू शकतो.

▮ १०० ग्रॅम साबुदाण्यामध्ये मध्ये ९४ ग्रॅम कर्बोदके, ०.२ ग्रॅम प्रथिने, ०.५ ग्रॅम तंतुमय घटक व फक्त १० ग्रॅम कॅल्शिअम असते. यावरून लक्षात येते की शरीरासाठी (वजन वाढवण्याखेरीज) तसा या पदार्थाचा काहीच उपयोग नाही.

▮ साबुदाण्यापासून पदार्थ बनवण्यासाठी त्यात जे पदार्थ वापरले जातात, त्यामध्ये बटाटा, शेंगदाणे कुट व इतर काही घटकांचा समावेश असतो. हे घटक पचायला अतिशय जड असतात यामुळे पित्त वाढणे, पोट फुगणे, पोट दुखणे, भूक मंदावणे अशा समस्या उद्भवतात.

▮ साबुदाणा आतड्यातील सर्व द्राव शोषून घेत असल्याने आपली मलप्रवृती सुद्धा कठीण होते. तसेच साबुदाण्यामुळे पित्ताचा त्रासही वाढतो.

अशाप्रकारे ज्या दिवशी हलका आणि प्रमाणात आहार घ्यायचा त्याच दिवशी, म्हणजे उपवासाच्या दिवशी आपण साबुदाण्यासारखा जड पदार्थ खाऊन स्वतःच्या शरीराचे नुकसान करून घेत आहोत. त्यामुळे वेळीच सावध व्हा व साबुदाण्याचा जितका हवा तितकाच वापर करा.

**आयुर्वेदानुसार मनुकांमध्ये भरपूर मात्रेत औषधी गुण असतात. आम्हाला रोज ४-५ मनुका खायलाच पाहिजे. मनुकांना सर्दी-खोकला आणि कफ दूर करण्याचे सर्वात उत्तम औषध मानले जाते. त्याशिवाय देखील मनुकांचे बरेच फायदे असतात. त्यात उपस्थित न्यूट्रिएंट्स बऱ्याच आजारांमध्ये फायदेशीर ठरतात. तर जाणून घेऊ रोज मनुका खाण्याचे काय फायदे आहेत...**

# रोज करा ५ मनुकांचे सेवन आणि बघा त्याचे फायदे

▮ मनुका खाल्ल्याने ब्लड सर्क्युलेशन इम्प्रुव्ह होते. यामुळे त्वचेची रंगत वाढते आणि रंग देखील निखरण्यास मदत होते.

▮ मनुकांमध्ये फायबर्स असतात. हे डायजेशन योग्य ठेवण्यास मदत करतात.

▮ यात पोटॅशियमची मात्रा जास्त असते. मनुका हार्ट ॲटॅकच्या आजारांमध्ये इफेक्टिव्ह आहे.

▮ यात आयर्न असतं. हे ॲनिमिया (रक्ताची कमतरता) दूर करण्यास फायदेशीर ठरतात.

▮ यात ॲंटीऑक्सिडेंट्स असतात. यामुळे कॅन्सरसारख्या गंभीर आजारांपासून बचाव होण्यास मदत मिळते.

▮ यात ॲंटीबॅक्टेरियल गुण असतात. यामुळे सर्दी-खोकला ठीक होण्यास मदत मिळते.

▮ यात बीटा कॅरोटिन असते, जे डोळ्यांसाठी फायदेशीर ठरतं.

▮ यात ऑक्झेलिक ॲसिड असतं. यामुळे दात मजबूत होतात. यामुळे गम प्रॉब्लेमपासून बचाव होतो.

▮ यात कॅल्शियमची मात्रा अधिक असते. म्हणून जॉइंट पेनपासून बचाव होतो.

▮ याचे सेवन केल्याने बॉडीचे टॉक्सिन्स दूर होऊन हेअर फॉलची समस्या देखील दूर होते.



**मनुका खाण्याचे हेल्दी मार्ग**

▮ कब्ज दूर करण्यासाठी रात्री पाच मनुका आणि एक लसणाची कळी खायला पाहिजे.

▮ मनुकांत मध मिसळून खाल्ल्याने देखील फायदा होतो.

▮ याला दुधात उकळून त्याचे सेवने केल्याने देखील फायदा होतो.

▮ मनुकांमध्ये बडिशेप आणि ओवा मिसळून खाल्ल्याने देखील फायदा होतो.

# जास्त मीठ खाल्ल्याने होऊ शकतो मधुमेह



**मधुमेहापासून** स्वतःला दूर ठेवायचे असेल तर केवळ साखर खाणे सोडून चालणार नाही. कारण, नुकत्याच करण्यात आलेल्या एका नव्या संशोधनानुसार जास्त मीठ खाणेही बनू शकते मधुमेहाचे कारण. संशोधकांच्या मते जास्त मीठ म्हणजे सोडियम खाल्ल्याने उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते.

मात्र, आता नव्या संशोधनामुळे जास्त मीठ खाणे हे कारण मधुमेह हा आजार होण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडते. लिस्बनमध्ये आयोजित युरोप असोसिएशन फॉर द स्टडी ऑफ डायबेटिसच्या वार्षिक बैठकीत यासंबंधी माहिती देण्यात आली. जे लोक दिवसभरात २.५ ग्रॅमपेक्षाही जास्त मीठ खातात, त्यांना टाइप २ डायबेटिसचा धोका ४३ टक्क्यांहून अधिक असतो. तसेच शरीराच्या आवश्यकतेपेक्षा ७.३ ग्रॅम जास्त मीठ खात असाल, तर टाइप २ डायबेटिसचा धोका वाढून तो ७२ टक्क्यांवर पोहोचतो.

# हंडाभर पाण्यासाठी डोंगर चढण्याची शिक्षा, कर्जत तालुक्यात पाण्यासाठी पायपीट



**पनवेल :** तीन दिवस अवकाळी पाऊस कोसळल्याने तापलेली जमीन काही अंशी थंड झाली असली तर पाणीटंचाई संपलेली नाही. अंगाची काहिली कमी झाली असली तर तहान भागेल अशी परिस्थिती नाही. त्यामुळे कर्जत तालुक्यातील पोशिर ग्रामपंचायतीमधील चिंचवाडी आदिवासी वाडीतील ग्रामस्थांना पाण्यासाठी प्रचंड पायपीट करावी लागत आहे. या गावातील नळपाणी योजनेचे काम रखडल्याने ग्रामस्थांना हंडाभर पाण्याची प्रचंड कष्ट करावे लागत आहेत.

चिंचवाडी आदिवासी वाडीसाठी राबवण्यात येत असलेली जलजीवन मिशन योजना अनेक महिन्यांपासून रखडली आहे. सरकारने नेमलेल्या कंत्राटदाराने काम न केल्याने अखेर नवीन कंत्राटदार नेमला आहे. मात्र, त्यामुळे योजना अपूर्ण राहिली आणि लोकांचे विनाकारण पाण्यावाचून हाल होत आहेत. जलजीवन मिशनची योजना रखडल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी डोंगर उतरावा लागत आहे. डोंगर चढउतार करून पाणी आणावे लागत असल्याने ग्रामस्थांचे पाण्याावाचून हाल होत आहेत. शिवाय पाण्यासाठी प्रचंड कष्ट उपसावे लागत आहेत. चिंचवाडी हे ६० उंबऱ्यांचे गाव असून अंदाजे ३०० लोकसंख्या आहे.

चिंचवाडी गावातील जलजीवन मिशन योजनेचे काम दोन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आले. पाणी साठवण टाकीचे काम अपूर्ण असल्याने वंजारपाडा येथून आलेल्या जलवाहिनीतून पाणी अर्धा किलोमीटरवर असलेल्या विहिरीत सोडले जाते. हा डोंगराळ भाग असल्याने येथून पाणी आणण्यासाठी डोंगराची चढउतार करावी लागत आहे. कर्जत तालुक्यातील १२६ गावांमध्ये जलजीवन मिशन योजना राबवली जात आहे. प्रत्यक्षात ६० टक्के कामे ही अपूर्ण आहेत. त्यामुळे नळपाणी योजनेवर खर्च करत असतानाच टँकरनेही पाणी पुरवठा लागत आहे. खांडस, नांदगाव, ओलमन या भागात प्रचंड पाणीटंचाई आहे. या भागात सरकारकडून तात्पुरती सोय म्हणून टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.

### महिलांची प्रचंड नाराजी

तीन महिन्यांपूर्वी घरात नळ बसवले आहेत. अजून नळाला पाण्याचा थेंब आलेला नाही. तसेच पाण्याच्या टाकीचे काम देखील पूर्ण झालेले नाही. आम्हाला आता पाण्याची खरी गरज आहे. मला मणक्याचा त्रास असला तरी पाण्यासाठी डोंगरातील रस्त्यावरून जावे लागते. आहे. पुरेसे पाणी नसल्याने दोन किलोमीटर लांबून बंगल्यावरून खासगी बोअरवेलचे पाणी आणावे लागत आहे. पाणी भरण्यासाठी दिवसाचा पूर्ण वेळ जातो. बाकीची कामे करायला वेळ मिळत नाही, अशा महिलांच्या तक्रारी आहेत.

# उमटे धरण गाळमुक्तीसाठी मुहूर्त पाहताय का, संघर्ष समिती पुन्हा आक्रमक

**पनवेल :** अलिबाग तालुक्याला पाणीपुरवठा करणाऱ्या उमटे धरणातील गाळ काढण्याबाबत उमटे धरण संघर्ष ग्रुप, रायगड आक्रमक झाला आहे. त्यांनी पुन्हा जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या सीईओ यांना निवेदन दिले आहे. विशेष म्हणजे सरकारने तीनवेळा निविदा सूचना प्रसिद्ध करूनही धरणातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात झालेली नाही. याबद्दल उमटे धरण संघर्ष ग्रुपने तीव्र नाराजी व्यक्त करून हे धरण गाळमुक्त करण्याबाबत सरकार केवळ धुळफेक करत असल्याचा आरोप केला आहे.

उमटे धरण संघर्ष ग्रुपने १४ मे २०२४ रोजी जिल्हा प्रशासनाला निवेदन देत धरणातील गाळ काढण्याची मागणी केली होती. या धरणाच्या पाण्यावर ४६ गावे आणि ३३ आदिवासी वाड्या अवलंबून आहेत. मार्चनंतर त्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. सध्या तीन दिवसांआड धरणातून पाणीपुरवठा होतो, तोही



अशुद्ध आणि मातीमिश्रीत असतो. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. ही बाब लक्षात घेऊनच 'मुहूर्त नव्हे, गाळ काढा' असे म्हणत धरणातील गाळ आणि डागडुजीच्या संदर्भात उमटे धरण संघर्ष ग्रुपने पुन्हा जिल्हाधिकारी आणि राजिपच्या सीईओंना निवेदन दिले आहे.

एक वषार्पूर्वी निवेदन देत मागणी करूनही गाळ काढण्याच्या कामाला अजून सुरुवात झालेली नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता (माणगाव) डी. ए. जाधव यांनी यंदा १७ मार्च रोजी उमटे धरणाचा गाळ काढण्याच्या संदर्भात रक्कम 8 कोटी 81 लाख ३५ हजार ६३१ रुपयांची ई-निविदा प्रसिद्ध केली होती. सरकारकडून सलग तीन वेळा निविदा सूचना प्रसिद्ध करूनही अजून गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात झालेली नाही. निधी उपलब्ध आहे तर गाळ का काढला जात नाही, असा सवाल संघर्ष ग्रुपने केला आहे.

त्यामुळे सरकारने आता उमटे धरणातील गाळ काढण्याच्या मुहूर्त न पाहता विशेष बाब म्हणून तत्काळ गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात करावी, अशी मागणी उमटे धरण संघर्ष ग्रुपने या निवेदनातून केली आहे.

# विविध नागरी समस्यांवर उपाय हवा



**कल्याण :** कल्याण डोंबिवली शहरातील आरोग्य व्यवस्था, शिक्षण, स्वच्छता नालेसफाई क्लस्टर योजना भुयारी गटार योजना, धोकादायक इमारती यासारख्या विविध विषयांवर प्रशासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत याबाबत आज कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्याबरोबर चर्चा केली. पालिका क्षेत्रात सुरू असलेली कामे गतीने पूर्ण करण्याचे आश्वासन यावेळी आयुक्तांनी दिल्याचे आमदार मोरे यांनी सांगितले. यावेळी ज्येष्ठ पदाधिकारी सदानंद थरवळ, माजी नगरसेवक आणि तालुकाप्रमुख महेश पाटील, कल्याण ग्रामीण विधानसभा संघटक बंडू पाटील, युवासेना शहर अधिकारी सागर जेधे, माजी नगरसेवक विष्णू गायकवाड यांच्यासह कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

शहरातील नागरिकांना उपचार मिळत नसल्याबाबत खंत व्यक्त करताना आरोग्य सुविधा सुधारण्यावर भर देण्याच्या सूचना आमदार मोरे यांनी आयुक्तांना केल्या. आज शुक्रवार ९ मे रोजी आमदार मोरे यांनी शहरातील विविध समस्यांबाबत आयुक्त गोयल यांच्याबरोबर पालिका मुख्यालयात चर्चा केली. यावेळी त्यांनी पावसाळ्यापूर्वी मुख्य नाल्यांची पूर्ण सफाई करा वरवर सफाई करण्यापेक्षा नागरिकांना दिलासा द्यावा. ज्या ठिकाणी पाणी साचते त्या ठिकाणी पयार्यी व्यवस्था करा यासारख्या सूचना दिल्या. तर महापालिकेच्या जागा संरक्षण भिंती बांधून ताब्यात घ्या ज्यामुळे त्यावर अतिक्रमण होणार नाही, दत्तनगर परिसरात महापालिकेच्या असलेल्या साडेतीन एकर जागेवर तातडीने क्लस्टर योजनेचा प्रकल्प सुरू करा यासारख्या सूचना त्यांनी आयुक्तांना दिल्या.

**रुग्णालयातील ह्ययाह्न कर्मचार्यांच्या बदल्या करा**

महापालिकेच्या दोन्ही रुग्णालयात वषार्नुवर्षे डॉक्टरेतर कर्मचारी ठाण मांडून बसले असून हे कर्मचारी मनमानी करत आहे. यामुळेच या कर्मचार्यांच्या तातडीने बदल्या करा अशी मागणी आमदार मोरे यांनी आयुक्तांकडे केली आयुक्तांनी याच बैठकीत याबाबत मुख्य वैद्यकीय अधिकर्यांना सूचना देत अहवाल मागवला आहे.

# आरटीई प्रवेश प्रक्रियेच्या मुदतीत वाढ




**ठाणे :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेश प्रक्रियेतील प्रतीक्षा यादी टप्पा क्र. ०३ साठी विद्यार्थ्यांच्या प्रवेश निश्चितीची अंतिम मुदत पूर्वी ०७ मे, २०२५ पर्यंत देण्यात आलेली होती. मात्र, अनेक पालकांकडून अद्याप प्रवेश प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे, या टप्प्यातील प्रवेशासाठी आता मुदतवाढ देऊन अंतिम तारीख १४ मे, २०२५ करण्यात आली आहे. या टप्प्यात निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी आवश्यक कागदपत्रांसह आणि अलॉटमेंट लेटरसह नजिकच्या पडताळणी केंद्रावर जाऊन, विहित मुदतीपूर्वी प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ही मुदतवाढ अंतिम असून, यानंतर या टप्प्यात प्रवेश प्रक्रिया करण्याची संधी मिळणार नाही, याची सर्व पालकांनी नोंद घ्यावी. या संदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी सांगितले की, शासनाच्या सर्वसमावेशक शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पालकांनी वेळेत प्रतिसाद देणे गरजेचे आहे. पात्र विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची संधी वाया जाऊ नये, यासाठी मुदतवाढ दिली आहे. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी स्पष्ट केले की, प्रवेश प्रक्रियेसाठी १४ मे ही अंतिम तारीख असून, या नंतरची कोणतीही विनंती ग्राह्य धरली जाणार नाही. पालकांनी योग्य ती काळजी घेऊन प्रवेश प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी.

## वेसावे येथील ५ बहुमजली इमारतींवर पालिकेचा हातोडा...

# आणखी ३५ अनधिकृत बांधकामे निष्कासित करणार



**मुंबई :** मुंबई महानगरात अनधिकृत बांधकामाविरोधात पालिका कारवाई करत आहे. याच पार्श्वभूमीवर, वेसावे येथील अनधिकृत पाच बहुमजली इमारतींवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के (पश्चिम) विभागाने निष्कासनाची कारवाई केली आहे.

वेसावे भागातील पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या दलदलीच्या प्रदेशावर आणि सागरी किनारा व्यवस्थापन क्षेत्रात सदर अनधिकृत बांधकाम होते. संबंधितांना वेळोवेळी नोटीस बजावूनही त्या नोटीसला प्रतिसाद देण्यात आले नाही. दलदलीच्या क्षेत्रातील या अनधिकृत बांधकामामुळे जीवितहानी होण्याची शक्यता असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिका उपायुक्त (परिमंडळ-४) डॉ. भाग्यश्री कापसे आणि सहायक आयुक्त (के पश्चिम) चक्रपाणी अल्ले यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

वेसावे भागातील सागरी किनारा व्यवस्थापन क्षेत्रातील (कोस्टल रेग्यूलेशन झोन) तेरे गल्लीतील कुटूर हाऊस (तळमजला +५), वेसावे पंप हाऊससमोरील साईश्रद्धा निवास (तळमजला +१), गोमा गल्ली येथील नागा हाऊस (तळमजला +४), मांडवी गल्ली येथील झेमणे हाऊस (तळमजला +३), बाजार गल्ली येथील गणेश सागर (तळमजला +३) या इमारतींचे मागील वर्षभराच्या कालावधीत अनधिकृतपणे बांधकाम करण्यात आल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच बांधकामासाठी प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची परवानगी घेण्यात आली नव्हती.

या पार्श्वभूमीवर निष्कासनाची कारवाई हाती घेण्यात आली. ३५ हँड ब्रेकर, ८ गॅस कटर तसेच ८ जनरेटरच्या सहाय्याने इमारतीचे पाडकाम करण्यात आले. या कारवाईदरम्यान महानगरपालिकेच्या ८० अधिकारी-कर्मचारी यांच्यासह पुरेसा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

दरम्यान, वेसावे भागातील सागरी किनारा व्यवस्थापन क्षेत्रात अशाप्रकारच्या आणखी ३५ अनधिकृत इमारती बांधण्यात आल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे. सदर बांधकामेही याच कारवाई अंतर्गत पुढील काही दिवसांमध्ये निष्कासित करण्यात येतील, असे बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात येत आहे.

# आता गुगल मॅपवर बेस्ट बसेसचा रिअल टाइम कळणार

**मुंबई :** बस कुठपर्यंत आली, थांब्यावर येण्यास बसला किती वेळ लागणार, कुठल्या बसला बस थांब्यावर येण्यास उशीर लागणार याची माहिती आता प्रवाशांना एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. बुधवार ७ मे पासून गुगल मॅपवर बेस्ट बसेसची माहिती प्रवाशांना उपलब्ध होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक एस व्ही आर श्रीनिवास यांच्या उपस्थितीत गुगल मॅपचा शुभारंभ केला.

केवळ कोणती बस पकडायची हेच नाही तर त्यांच्या थांब्यावर येणाऱ्या बसची प्रत्यक्ष आगमन वेळ देखील दिसेल. यामुळे अंदाजे प्रवास कालावधी तसेच आणि लक्षणीय विलंबाची सूचनाही प्रवाशांना मिळेल.

लाईव्ह माहितीवर आधारित आगमन वेळा गुगल मॅपवर हिरव्या किंवा लाल रंगात चिन्हांकित केल्या आहेत. बेस्ट उपक्रमाने दिलेल्या माहितीच्या आधारे गुगल मॅप ही माहिती अद्ययावत करेल. बेस्ट आणि गुगल मॅपमधील हे सहकार्य वाहतूक सेवेला बळकटी देण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे, असे फडणवीस म्हणाले.

### असा वापरा गुगल मॅप

तुमच्या अँड्रॉइड किंवा आयओएस डिव्हाइसवर गुगल मॅप्स ॲप उघडा. तुमच्या गंतव्य स्थानाची निवड करा आणि 'गो' आयकॉनवर टॅप करा आणि स्त्रोत' आणि ' गंतव्य स्थान' नोंद करा. जर आधीच निवडलेले नसेल, तर हिरव्या किंवा लाल रंगात ठळक केलेली वेळ, बस क्रमांक, मार्ग-प्रत्यक्ष आगमन माहिती पाहण्यासाठी 'सार्वजनिक वाहतूक' पद्धत (छोटा ट्राम आयकॉन) निवडा. शिफारस केलेल्या निकालावर टॅप केल्याने तुम्हाला मार्गाच्या थांब्यांबद्दल अधिक माहिती पाहता येते. तसेच विशिष्ट बसथांबा शोधून बसची प्रत्यक्ष माहिती मिळवणे देखील शक्य आहे. सर्व येणाऱ्या बसेसची यादी पाहण्यासाठी ते आणि त्याचे सूचीबद्ध बस क्रमांक निवडा, स्थान-सक्षम बसेस त्यांची प्रत्यक्ष आगमन वेळ (हिरव्या किंवा लाल दिव्याने दर्शविलेले) प्रदर्शित करतील.

# मुलाची हत्या करून पित्याची आत्महत्या

**डहाणू :** जव्हार तालुक्यात वडिलांनी आपल्या १५ वर्षांच्या मुलाची हत्या करून त्यानंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना जव्हार तालुक्यात घडली आहे. आदित्य उर्फ भावेश शरद भोये (१५) असे मृत मुलाचे आणि शरद रघुनाथ भोये (४०) हे आत्महत्या करणाया वडिलांचे नाव आहे. पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील पिंपळशेत परिसरात राहणारे शरद भोये यांचे वडील रघुनाथ जानू भोये बुधवारी दुपारी एक वाजताच्या सुमारास पिंपळशेत होळीची माळी येथील त्यांच्या शेतावरील घरी गेले असता त्यांना एक धक्कादायक दृश्य घरात दिसून आले. त्यांच्या १५ वषार्चा नातू भावेश याचा मृतदेह घरात पडला होता आणि दुर्सया खोलीत त्यांच्या मुलगा शरदने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यानंतर याबाबतची माहिती पोलिसांना देण्यात आली, घटनेची माहिती मिळाल्यानंतर जव्हार पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दोनही मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवून घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. याप्रकरणी जव्हार पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहितेच्या कलम १०३ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शरद भोये यांनी मुलगा भावेश याची हत्या करून स्वतः आत्महत्या का केली याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. जव्हार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून या हत्येचा आणि आत्महत्या कशामुळे केली याचा तपास जव्हार पोलीस करत आहेत.

# रोहा तालुक्यात बालविवाह

## पतीसह सासू सासरे, आईवडिलांविरोधात गुन्हे

**पनवेल :** त्या अल्पवयीन मुलीचे गेल्या वर्षी मेमध्ये लग्न झाले होते. शिवाय ती पाच महिन्यांची गरोदरदेखील आहे. मात्र, इच्छा नसताना लग्न लावून दिल्याने तिच्या तक्रारीनंतर रोहा पोलीस ठाण्यात अल्पवयीन विवाहितेच्या आईवडिलांसह पती आणि सासू-सासरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे रोहा तालुक्यात खळबळ उडाली आहे.

ही अल्पवयीन (१६) मुलगी रोहे तालुक्यातील तांबडी बौद्धवाडीतील आहे. तिचे लग्न १० मे २०२४ रोजी प्रवीण संजय पवार (२२) याच्याशी जबरदस्ती लावण्यात आले होते. लग्नानंतर ती पतीसोबत रत्नागिरी येथील पाडावेवाडी (मिरजोळे) राहात होती. गंभीर बाब म्हणजे मुलगी अल्पवयीन आहे हे माहित असूनही तिचे आईवडील आणि मुलाचे आईवडील यांनी तसेच होणार पती यांनी लग्नासाठी पुढाकार घेतला. त्यानंतरही अल्पवयीन पत्नीशी पतीने शरीरसंबंध ठेवले. त्यामुळे ही अल्पवयीन विवाहिता आता ५ महिन्यांची गर्भवती आहे.

अखेर संधी मिळताच या अल्पवयीन मुलीने रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर २ मे रोजी रोहा पोलीस ठाण्यात पीडित मुलीच्या तक्रारीच्या अनुषंगाने आरोपी नवरा प्रवीण संजय पवार, सासू संगीता संजय पवार, सासरे संजय अप्पा पवार (तरडगाव, सातारा), वडील बबन बाबुराव जाधव, आई सविता बबन जाधव (तांबडी बौधवाडी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सलमान खतीब या प्रकरणाचा तपास करत आहेत.



### पतीविरोधात बलात्काराचा गुन्हा

या प्रकरणात मुलीचे आईवडील आणि सासू-सासरे यांच्याविरोधात बालविवाह लावण्याचा गुन्हा तर पतीविरोधात बलात्काराचाही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एक वषार्नंतरही हे प्रकरण उघडकीस आले आहे. बालविवाहाविरोधात कडक कायदे असतानाही त्याची पायमल्ली होत असल्याचे या निमित्ताने समोर आले आहे.

# पेणमध्ये चाललंय तरी काय, सर्वपक्षीय रॅलीमध्ये कुणाचा केला निषेध

**भिवंडी :** अलिबाग : भारत-पाकिस्तान यांच्या युद्धजन्य स्थिती असताना पेणमधील एका युवकाने दोन धर्मियांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या सोशल मीडियावरील पोस्टनंतर पेण तालुक्यात खळबळ उडाली. त्यानंतर ९ मे रोजी रात्री पावणे अकराच्या सुमारास त्याच्यावर पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर शनिवारी पेणमध्ये सर्वपक्षीय निषेध रॅली काढून मोसिन मुजावर याचा निषेध केला.

पेणमधील मोसिन मुजावर या तरुणाने ३ एप्रिल रोजी दुपारी पावणेबाराच्या सुमारास भारताविरोधी चिथावणीखोर पोस्ट केली. सोशल मीडियावर ही पोस्ट व्हायरल झाल्यानंतर आयुष किरण शहा, पेण यांनी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे अध्यक्ष साईराज कदम यांच्याशी चर्चा करून ९ मे रोजी पेण पोलिसांकडे फिर्याद दाखल केली. पोलिसांनी त्याची सोशल मीडियावरील पोस्टची खात्री



केल्यानंतर मोसिनविरोधात गुन्हा दाखल केला. मोसिनने त्याच्या सोसल मीडिया अकाऊंट आयडीवरून फियार्दी आयुष किरण शहा यांच्या सोशल मीडियाला टॅग केले.

'इंडिया के रुल्स की तहेस नहेस हो गई है, संभलके रहो हमारे पास तो तलवारे, बॉम्ब, मिसाईल सब रेडी है, देख रहा है ना इराण सब लेके बैठा है! जो भी मुस्लिम को तकलीफ देगा एक मिनिट मे उडा देगा वो, एक दिन इंडिया भी हमारा होगा, पुरा कब्जा हमारा होगा, और हम मस्त दबा के मारेंगे' असे चिथावणीखोर आणि चुकीची माहिती फियार्दी आयुष शहा यांना देवून त्यांच्या मनामध्ये भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

मोसिनच्या या मेसेजनंतर खळबळ उडाली. त्याने देशाविरुद्ध चिथावणीखोर विधान करून दोन धर्मियांत तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यामुळे पेणमधील सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि रहिवाशांनी त्याचा जोरदार निषेध केला आहे. त्यांनी पेण नगरपरिषदे आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासमोर पाकिस्तानचे बॅनर पायाखाली तुडवून आणि पाकिस्तानविरोधी घोषणा दिल्या. पेण पोलिसांनी याची याची गंभीर दखल घेत मोसिन मुजावर याच्यावर गुन्हा दाखल करून उपविभागीय पोलीस अधिकारी (पेण विभाग) गजानन टोंपे, पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक बेग तपास करत आहेत.

# नवी मुंबईचा तरुण कर्जतमध्ये बुडाला... शनिवारी रविवारी काय घडलं

**पनवेल :** कर्जतमधील धरणात बुडालेल्या नवी मुंबईच्या अजय विष्णू रावत (२८) याचा मृतदेह रविवारी (११ मे) सकाळी ९ वाजता सापडला. शनिवारी दुपारी ३ वाजता तो बुडाला होता. अजय विष्णू रावत कर्जत तालुक्यातील पाषाणे येथील नातेवाईकांकडे आला होता. दुपारी जेवणानंतर अंघोळीसाठी जवळच असलेल्या लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या धरणावर गेला असता पाण्याचा अंदाज न आल्याने अजय बुडाला. शनिवारी (१० मे) दुपारी ३ वाजता ही दुर्घटना घडली. त्यानंतर बराच शोध घेऊनही त्याचा मृतदेह सापडला नव्हता. अखेर आज सकाळी ९ वाजता हेल्प फाऊंडेशनच्या टीमने मृतदेह शोधला. नवी मुंबईतील दिघा गावामधील अजय रावत टुरिस्ट कारचा व्यवसाय करतात. चार मित्रांना घेऊन तो कर्जत तालुक्यातील पाषाणे येथील नातेवाईकाकडे शनिवारी गेला होता. अजयचे नातेवाईक पाषाणे गावातील नवीन वसाहतीमध्ये राहायला आहेत. त्यांना त्या भागाची संपूर्ण माहिती नसल्याने पाषाणे येथील लघुपाटबंधारे धरणाची खोली किती आहे आणि नवीन पोहणारे यांच्यासाठी हे धरण धोकादायक आहे यांची माहिती नव्हती. माहिती नसतानाही अजय रावत आणि त्याचे चार मित्र पाषाणे येथील धरणावर गेले.

पाषाणे धरणातील पाण्यात उतरलेला अजय रावत पाण्याबाहेर आलाच नाही. त्यामुळे त्याचे चारही मित्र घाबरले. त्यांनी तासाभराने अजयच्या नातेवाईकांना अजय पाण्यात बुडल्याचे सांगितले. साडेचार



वाजता सर्व नातेवाईक धरणावर पोहचले. त्यांनी पुन्हा अजयचा शोध सुरु केला. मात्र, काहीही उपयोग झाला नाही. साडेपाच वाजता नेरळ पोलिसांना कळवल्यावर कळंब पोलीस चौकीचे उपनिरीक्षक आर. एल. वसावे तसेच पोलीस नाईक निलेश कोंडार यांनी स्थानिक आदिवासींच्या मदतीने अजयचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. अखेर नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी खोपोलीतील अपघातग्रस्तांची टीम यांना कळवले. तोपर्यंत रात्र झाल्याने अपघातग्रस्त टीममधील हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठलेकर आणि त्यांच्या टीमने रविवारी सकाळी ८ वाजता पाषाणे धरण गाठले. त्यानंतर शनिवारी दुपारी बुडालेल्या अजयचा मृतदेह बाहेर काढला. अजयचा मृतदेह कळंब येथे शवविवच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. नेरळ पोलीस ठाण्यात त्याच्या मृत्युची अकस्मित अशी नोंद करण्यात आली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००० १४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com